cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२८ | गुरूवार दि.१६ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### दुष्काळी अंदाज : प्रशासनाने सतर्क व्हावे.

भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात मान्सून अर्थात मोसमी पावसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. किंबहुना, शेतीच्या भरण, पोषणापासून अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटकावर परिणाम करणाऱ्या मान्सूनच्या प्रवासात यंदा एल निनोचे विघ्न येण्याची दाट चिन्हे आहेत. ही दुष्काळाची चाहूलच म्हटली पाहिजे.

# शेतकऱ्यांचा उद्या पुन्हा एल्गार

## गहू खरेदीला विलंब होत असल्याने रेल्वे रोको आंदोलन

दिल्ली । वृत्तसंस्था

**गहू खरेदीसाठी विलंब केला जात असल्याबद्दल पंजाबमधील शेतकरी संघटनांनी आंदोलनाची घोषणा केली आहे. गहू खरेदी तत्काळ सुरु करावी आणि सध्याचे खरेदीबाबतचे नियम शिथिल करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. पंजाबमध्ये १७ एप्रिल रोजी राज्यव्यापी रेल्वे रोको आंदोलन करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.**

शेतकरी संघटनांनी संयुक्तपणे १७ एप्रिल रोजी दुपारी १२ ते ३ दरम्यान राज्यभर रेल्वे रोको करणार असल्याचे सांगितले आहे. हा निर्णय संयुक्त किसान मोर्चा, किसान मजदूर मोर्चा यांच्या संलग्न असलेल्या संघटनांनी घेतला आहे. तसेच, या निर्णयाला आझाद किसान मोर्चाने पाठिंबा दर्शवला आहे. जर खरेदी प्रक्रिया लवकर सुरू झाली नाही, तर दुपारी १२ ते ३ या वेळेत रेल्वे गाड्या रोखल्या जातील, असा इशारा त्यांनी दिला आहे. राज्यातील अनेक भागात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे काढणीला आलेल्या शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामुळे गव्हाचा दर्जा खालावला आहे. परिणामी, शेतमाल बाजार समित्यांमध्ये विक्रीविना तसाच पडून आहे. त्यात खरेदी प्रक्रियेसाठी विलंब केला जात असल्याने शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल कमी दरात विकावा लागत असल्याचे शेतकरी संघटनांनी निदर्शनास आणून दिले आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. तसेच बारदानाची टंचाई आहे. तसेच खरेदी केंद्रांवर निवारा आणि स्वच्छतागृहांची सुविधा नसल्याच्या समस्यांकडेही शेतकरी संघटनांनी लक्ष वेधले आहे. शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा हा प्रश्न आहे. त्यासाठी गहू खरेदी लवकर सुरु होणे गरजेच असल्याचे सांगत शेतकरी नेत्यांनी आंदोलनासाठी जनतेच्या पाठिंब्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. जाचक अटी आणि खरेदीसाठी विलंब केला जात असल्याने मोठ्या अडचणींना



▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### सीबीएसईकडून दहावीचा निकाल जाहीर

नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड म्हणजेच सीबीएसईनं दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ चा निकाल ९३.७० टक्के लागला आहे. गेल्या वर्षी सीबीएसईच्या दहावीचा निकाल ९३.६६ टक्के होता, त्या तुलनेत यंदा निकालात सुधारणा झाली आहे. बोर्डानं यावेळी उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल दरवर्षीच्या तुलनेत एक महिना अगोदर जाहीर केला आहे. दरवर्षीप्रमाणं यंदा देखील सीबीएसईच्या दहावीच्या निकालात मुलींनी मुलांना मागं टाकत बाजी मारली आहे. मुलांच्या तुलनेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलींची टक्केवारी अधिक आहे. सीबीएसईनं अधिकृतपणे टॉपर यादी जाहीर केली नाही. मात्र, गुणवत्ता प्रमाणापत्र त्या त्या विषयात अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणार आहेत.

### जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क – मुख्यमंत्री

मुंबई: जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५–१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकाराला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

### मोदी आणि ट्रम्प यांच्यात फोनवरून चर्चा

नवी दिल्ली : मध्य पूर्व आशियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धबंदीच्या करारानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात पहिली दूरध्वनी चर्चा पार पडली. सुमारे ४० मिनिटे चाललेल्या या संभाषणात दोन्ही नेत्यांनी जागतिक आणि द्विपक्षीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. या संवादानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं की, माझे मित्र, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा मला फोन आला. विविध क्षेत्रांमध्ये आमच्या द्विपक्षीय सहकार्यात साध्य झालेल्या महत्त्वपूर्ण प्रगतीचा आम्ही आढावा घेतला. सर्वच क्षेत्रांमध्ये आमची सर्वसमावेशक जागतिक सामरिक भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आम्ही पश्चिम आशियातील परिस्थितीवरही चर्चा केली आणि हॉर्मुझची सामुद्रधुनी खुली व सुरक्षित ठेवण्याच्या महत्त्वावर भर दिला.

## खरात प्रकरणाचे कनेक्शन थेट मंत्रालयापर्यंत !

### अंजली दमानियांनी केला गौप्यस्फोट, थेट अधिकाऱ्यांची घेतली नावे

मुंबई । प्रतिनिधी

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाचे धागेदोरे थेट प्रशासकीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचले आहेत. अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषदेत बड्या अधिकाऱ्यांची नावे जाहीर करत खळबळजनक गौप्यस्फोट केले आहेत. भोंदू अशोक खरात प्रकरणाचे कनेक्शन थेट मंत्रालयापर्यंत, नावासह कोणाचे किती कॉल असे अंजली दमानियांनी सर्वच सांगितले.

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी दररोज नवनवीन खुलासे होताना दिसत आहेत. आता अशोक खरात प्रकरणाचे धागेदोरे प्रशासकीय वर्तुळापर्यंत पोहोचले आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आता याप्रकरणी एक धक्कादायक खुलासा केला आहे. अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेत अशोक खरात याला प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या बड्या अधिकाऱ्यांची नावे जाहीर केली आहेत. या सर्वांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. अंजली दमानिया यांनी नुकतीच पत्रकार परिषद घेत अनेक मोठे खुलासे केले आहेत. त्यांनी विविध फोटो पोस्ट करत मोठमोठे खुलासे केले आहेत. अशोक खरातला जिल्हाधिकाऱ्यासह तहसीलदार, उपजिल्हाधिकारी आणि पोलिस अधिकाऱ्यांनी शेकडो वेळा दूरध्वनीवरून संवाद साधला, असे कॉल डिटेल्समधून समोर आले आहे. या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या सर्वांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. अशोक खरातला ज्यांनी मदत केली याची माहिती समोर आणणे फार गरजेचे आहे. यात एक जिल्हाधिकारी आहेत ज्यांनी त्यांना खूप मदत केली होती. ते मुंबईत कार्यरत आहेत. आता मी त्यांचे नाव



▶▶ पान २ वर

## महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा द्या–मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा आणि राज्यसभेतील महाराष्ट्रातील सर्व खासदारांना पत्र पाठवून या विधेयकाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.**

या पत्रामध्ये उद्धव ठाकरे, हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे आणि सुनील तटकरे यांच्यासह विविध राजकीय नेत्यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या पत्रातून महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा द्या आणि या ऐतिहासिक निर्णयाचे साक्षीदार व्हा, असे आवाहन केले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी ही पत्रे संबंधित नेत्यांना पाठवण्यात आली आहेत. दरम्यान, केंद्र सरकारने महिला आरक्षण विधेयक लवकरात लवकर लागू करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले असून, त्यामध्ये या विधेयकावर चर्चा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील सर्व पक्षांनी एकमताने हे विधेयक मंजूर करावे, असे आवाहन केले आहे. त्यामुळे या अधिवेशनाकडे देशभराचे लक्ष लागले आहे.महिला आरक्षणाशी संबंधित नारी शक्ती वंदन कायदा २०२३ मध्ये मंजूर झाला होता. आता त्यामध्ये काही सुधारणा करून तो २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी लागू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या नव्या विधेयकात लोकसभेच्या जागांची संख्या वाढवण्याची



▶▶ पान २ वर

## पेट्रोल १८, डिझेल ३५ रु.नी महागणार ?



नवी दिल्ल । वृत्तसंस्था

कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे पेट्रोल १८ रुपये आणि डिझेल ३५ रुपये (प्रति लिटर)पर्यंत महाग होऊ शकते. विदेशी ब्रोकरेज फर्म मॅक्वायरीच्या अहवालात म्हटले आहे की, कच्चे तेल महाग असूनही देशात पेट्रोल–डिझेलच्या किमती स्थिर आहेत. यामुळे कंपन्यांना नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत पश्चिम बंगालसह पाच राज्यांमधील निवडणुका संपल्यानंतर कंपन्या दर वाढवू शकतात.

कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लिटर १८ रुपये आणि डिझेलवर ३५ रुपयांचे नुकसान होत आहे.

▶▶ पान २ वर

## आता शिंदे–केसरकरांची चौकशी एसआयटी कधी करणार ?

### ठाकरे सेनेच्या नेता सुषमा अंधारे यांचा सरकारला सवाल

सिंधुदुर्ग । प्रतिनिधी

**राज्यात नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण गाजत असून राजकीय नेत्यांची नावेही समोर येत आहेत. तसेच, राजकीय नेत्यांवर आरोपही केले जात आहेत. शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत एसआयटी आणि गृहमंत्र्यांना सवाल केले आहेत. महायुतीमधील नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दीपक केसरकरांना चौकशीला कधी बोलावणार? असा सवाल त्यांनी केला.**

अशोक खरातचे समोर आलेला सीडीआर खरा आहे की खोटा आहे हे मुख्यमंत्र्यांनी सांगावे. जर ते खरे असतील तर दीपक केसरकर आणि एकनाथ शिंदे यांना चौकशीला कधी बोलावणार? रुपाली चाकणकर यांना गजाआड कधी करणार? या प्रश्नांचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यावे, असे म्हणत सुषमा अंधारेंनी खरातप्रकरणावरुन राज्य सरकारला अनेक सवाल केले आहेत. मात्र, सुषमा अंधारेंचे आरोप हे राजकीय हेतुने प्रेरीत असल्याचे स्पष्टीकरण आमदार दीपक केसरकर यांनी दिले आहे. अशोक खरात प्रकरण आणि सुषमा अंधारे यांनी केलेल्या आरोपासंदर्भात एस.आय.टी. आणि ईडी दोन्ही चौकशी चालू आहेत. कुठं चुकून जरी नाव मिळालं, तरी त्या व्यक्तीला बोलवले जाते. शेवटी कोणाला भेटाणे किंवा कोणाबरोबर फोटो



▶▶ पान २ वर



## एसटीला दररोज १.६ कोटींचा तोटा; महामंडळाने केले स्पष्ट

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यभरात सेवा पुरवणाऱ्या महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाला (एमएसआरटीसी) गेल्या आर्थिक वर्षात दररोज सरासरी १.६० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे, असे अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आले आहे.**

महामंडळाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, एसटी महामंडळ हे देशातील सर्वात मोठ्या राज्य–संचालित परिवहन महामंडळांपैकी एक असून १५,००० हून अधिक बसेसचा ताफा आणि सुमारे ९०,००० कर्मचारी आहेत. ते दररोज ५५ लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा देतात. यासाठी सुमारे ३३ कोटी रुपयांच्या खर्चाच्या तुलनेत त्यांची दैनंदिन कमाई ३१.४० कोटी रुपये आहे. २०२५–२६ या आर्थिक वर्षात एकूण खर्च १२,०६६ कोटी रुपये होता, तर बस सेवेतून ११,४७५ कोटी रुपयांचा महसूल मिळाला, परिणामी ५९१ कोटी रुपयांचा तोटा झाला.

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२४.०० क्विंटल | १,९०० | २,६५७ | २,२४५ |
| ज्वारी/हायब्रिड: २४८.०० क्विंटल | २,००० | ५,२०० | २,८७० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १०.०० क्विंटल | ७,४०० | ७,४०० | ७,४०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १२२.०० क्विंटल | २,२०० | २,८०० | २,४३९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,४०१ | ५,१५० | ४,७७५ |


# राज्यात उष्णतेचा तडाखा

## हीट वेव्हची परिस्थिती, हवामान खात्याचा गंभीर इशारा

पुणे । प्रतिनिधी

**हवामान विभागाने महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. पुढील ४ दिवस तापमानात मोठी वाढ होणार असून १७ एप्रिलला सर्वाधिक तापमान राहण्याची शक्यता आहे.**

संपूर्ण महाराष्ट्र सध्या भीषण उष्णतेच्या विळख्यात सापडला असून, राज्याच्या तापमानाचा पारा सातत्याने चढत आहे. नांदेडच्या देगलूर मध्ये ४७ अंश तर विदर्भातील अकोला शहरात ४४ अंश तापमानाची नोंद झाली असून, येत्या १७ एप्रिल रोजी एप्रिल महिन्यातील सर्वात उष्ण दिवसाचा अनुभव येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. राज्याच्या निम्म्या भागात उष्णतेची लाट येणार असल्याने प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन दिवस तापमानामध्ये १ ते २ अंशांनी वाढ होणार आहे. कर्नाटक व लगतच्या महाराष्ट्रात उच्च दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. यामुळे हवा खाली दाबली जात असल्याने ती गरम होत आहे. यामुळे जमिनीलगतची उष्णता वातावरणात वर जाऊ शकत नसल्याने तापमान वाढत आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्स कमकुवत झाले आहे. त्यामुळे त्यांचा प्रभाव ओसरला असून आभाळ निरभ्र झाले आहे. त्यामुळे सूर्याची किरणे थेट जमिनीवर पडून तापमान वाढत आहे, असे हवामानतज्ज्ञांनी सांगितले. अकोल्याचे तापमान ४८ तासांत ४५ अंशांचा टप्पा ओलांडण्याचा अंदाज आहे. अरबी समुद्रावरून



▶▶ पान २ वर

### अकोल्यात उष्माघाताचा पहिला बळी

अकोला शहरातील जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत एका मालवाहू ऑटोमध्ये अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहावर कोणत्याही मारहाणीच्या किंवा जखमेच्या खुणा नव्हत्या. पोलिसांचा अंदाज आहे की, या व्यक्तीचा उष्माघातामुळे मृत्यू झाला असावा. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून, वैद्यकीय अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण समोर येईल. तरीही पोलिसांनी उष्माघाताचा संशय व्यक्त केला आहे. यामुळे अकोल्यात उष्माघाताचा पहिला बळी गेल्याची बातमी समोर आली आहे.

## परभणीत पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते गौतम मुंडेंच्या घरावर गोळीबार

परभणी । प्रतिनिधी

शहरातील सुजाता कॉलनी परिसरात बुधवारी दुपारी सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास गोळीबाराची धक्कादायक घटना घडली. पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे मराठवाडा संघटक गौतम मुंडे यांच्या घरावर अज्ञात व्यक्तीकडून जुन्या वादातून तब्बल तीन राऊंड फायर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या गोळीबारात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी अचानक झालेल्या फायरिंगमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले.

थेट घरावर गोळ्या झाडल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. दरम्यान, फायर करणाऱ्या व्यक्तीस स्थानिकांनी रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्याने शेजारील घरावर दगडफेक केल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे नागरिकांमध्ये अधिकच घबराट पसरली. त्यानंतर स्थानिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, स्थानिक गुन्हे शाखेचे शाखेचे पोलीस निरीक्षक विवेक पाटील,

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# दुष्काळी अंदाज : प्रशासनाने सतर्क व्हावे...

भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात मान्सून अर्थात मोसमी पावसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. किंबहुना, शेतीच्या भरण, पोषणापासून अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटकावर परिणाम करणाऱ्या मान्सूनच्या प्रवासात यंदा एल निनोचे विघ्न येण्याची दाट चिन्हे आहेत. ही दुष्काळाची चाहूलच म्हटली पाहिजे.

यंदा जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या मान्सूनच्या कालावधीत पाऊसमान कमीच राहणार असल्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज चिंता वाढवणाराच म्हटला पाहिजे. या वर्षी मान्सून अर्थात नैत्य मोसमी पावसावर एल निनोचा प्रभाव राहणार असून, देशभर सरासरीच्या ९२ टक्के पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे देशात अवर्षणाच्या स्थितीची शक्यता ३५ टक्के, तर सरासरीपेक्षा कमी ३१, सर्वसाधारण पाऊस २७, अतिरिक्त पाऊस ६, तर अतिवृष्टीची शक्यता १ टक्के इतकी वर्तविण्यात आली आहे. अवर्षणाचे ढग दाटत चालल्याचीच ही नांदी ठरावी. जून ते सप्टेंबरदरम्यान दरवर्षी साधारणपणे ८७ सेंमी इतका पाऊस होतो. सध्या प्रशांत महासागरातील ला निनो म्हणजेच थंड पाण्याचे प्रवाह कमकुवत होत आहेत. तर मान्सूनच्या कालावधीत एल निनो अर्थात गरम पाण्याचे प्रवाह विकसित होण्याची शक्यता आहे. खरे तर पाऊसपाण्याच्या दृष्टीने एल निनो हा घटक अतिशय महत्त्वाचा मानला जातो. एल निनो काळात समुद्राचे तापमान अनैसर्गिकरीत्या वाढते. वातावरण सामान्यपेक्षा उष्ण होते. त्याचबरोबर वाऱ्याची दिशा व दाब बदलून हवामानावर तसेच मोसमी वाऱ्यांवर त्याचा परिणाम होतो. एल निनोमुळे हिंदी महासागराकडून येणारे वारे कमकुवत होण्याची शक्यता असल्याने भारतात नैत्य मोसमी पावसावर त्याचा परिणाम होण्याची दाट शक्यता संभवते. आत्तापर्यंतचा इतिहास पाहिला, तर एल निनो स्थिती असताना भारताला अनेकदा दुष्काळाला सामोरे जावे लागण्याची उदाहरणे आहेत. मागची काही वर्षे पाऊस पाण्याच्या दृष्टीने चांगली गेली, यात संदेह नाही. गतवर्षी देशभरात सरासरीच्या १०८ टक्के पावसाची नोंद झाली होती. परंतु, हा आकडा खरोखरच ९२ टक्क्यांपर्यंत खाली आला, तर काय परिस्थिती उद्भवेल, याची कल्पनाच केलेली बरी. चांगल्या पावसानंतरही यंदा अनेक शहरांमध्ये पाणीटंचाई असून, स्थानिक स्वराज्य संस्थांवर पाणीकपात करण्याची वेळ आली आहे. दुसऱ्या बाजूला अनेक भागांत भूजल पातळी खालावल्याने कूपनलिका आटल्याचे चित्र दिसते. हे पाहता पावसाने ओढ दिल्यास हे वर्ष पाणीबाणीचे ठरण्याचा धोका स्पष्टपणे दिसतो. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडूच्या बहुतांश भागात पावसाची तूट जाणवू शकेल. तसेच मध्य प्रदेश, राजस्थान गुजरातचा बहुतांश भाग, पंजाब, हरियाणा, दिल्ली, चंदीगड, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओरिसा, उत्तर दक्षिण आंध्र प्रदेश, उत्तर तेलंगणा, छत्तीसगड व अंदमान बेटांच्या बहुतांश भागातही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. याचा विचार करता सर्वच राज्यांना ॲलर्ट रहावे लागेल. उपलब्ध पाण्याचा जपून वापर करण्यासह पाण्याचा काटकसरीने वापर करावा लागेल. तसेच पाणीगळतीसाठीही आवश्यक उपाययोजना कराव्या लागतील. भारतासारख्या देशात आजही ६० ते ६५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. या शेतीचे भरण आणि पोषण होते, ते मान्सूनच्या पावसावरच. तथापि, पावसाने ताण दिला, तर त्याचा शेती आणि उत्पादनावर पर्यायाने रोजगारावही परिणाम होऊ शकेल. भारतीय अर्थव्यवस्थेकरिताही मान्सून उपकारक ठरत असतो. परंतु, मोसमी पावसामुळे निसर्गचक्राला फटका बसला, तर अर्थचक्राच्या गतीलाही ब्रेक लागण्याची भीती असेल. स्कायमेट या खासगी संस्थेनेही आपला अंदाज जाहीर केला असून, त्यातही सरासरीच्या ९४ टक्के पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. एकूणच यंदाच्या हंगामात पाऊस कमी पडणार, असेच लक्षण दिसते. पावसाचा ताण आणि दुष्काळ हे तर समीकरणच. त्यामुळे दुष्काळ गृहित धरूनच आत्तापासून शासन, प्रशासनाला पावले उचलावी लागतील.

# कमी झोप घेणाऱ्यांत लठ्ठपणाचा धोका जास्त–डॉ.जगदीश टेकाळे

बीड । पतिनिधी

**आपण कमी झोप घेतो तेव्हा केवळ थकवा किंवा एकाग्रतेची समस्या निर्माण होत नाही तर याचा थेट संबंध वजन वाढण्याशी जोडला जातो. म्हणजेच अपुरी झोप ही लठ्ठपणाचे एक महत्वाचे कारण ठरू शकते. झोप कमी झाल्यावर शरीरातील ग्रेलिन (भूक वाढवणारा हार्मोन) वाढतो व लेप्टिन (पोट भरल्याची जाणीव करून देणारा हार्मोन) कमी होतो. आपल्याला वारंवार भूक लागते आणि आपण जास्त प्रमाणात, अनेकदा चुकीचे पदार्थ (तळलेले, गोड, थंड पेये) खाऊ लागतो. झोपेच्या कमतरतेमुळे मेटाबॉलिझम मंदावतो. म्हणजे शरीरातील कॅलरी जाळण्याचा वेग कमी होतो व अतिरिक्त कॅलरी फॅटच्या स्वरूपात साठू लागतात.**



ताण वाढवणारा कॉर्टिसोल हार्मोन झोप कमी झाल्यावर जास्त प्रमाणात तयार होतो. हृदयरोग, मधुमेह (डायबिटीज), डिप्रेशन व मानसिक आरोग्याच्या समस्या, स्मरणशक्ती कमी होणे,पचनासंबंधी त्रास,,कब्ज चांगली झोप येण्यासाठी उपाय, दररोज ठरलेल्या वेळी झोपण्याची आणि उठण्याची सवय लावा. झोपण्यापूर्वी मोबाईल,टी.व्ही.लॅपटॉप यांचा वापर टाळा, झोपण्यापूर्वी जड किंवा तेलकट अन्न घेऊन नका, हलके जेवण करा., दिवसभर पुरेसे पाणी प्या,शरीर हायड्रेटेड ठेवा दारु व कॅफिनयुक्त पेये (चहा,कॉफी,कोल्ड ड्रिंक)टाळा. चांगल्या आरोग्यासाठी झोप ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. वयाच्या विविध टप्प्यांवर दररोज झोपेचे नियोजन करणे गरजेचे असल्याचा सल्ला आरोग्य तज्ज्ञ (३ देतात. नवजात बाळ महिन्यांपर्यंत) १४ ते १७ तास, बाळ (४ ते १२ महिने) १२ ते १६ तास, लहान मुले (१ ते ५ वर्षे) १० ते १४ तास, शाळेतील मुले (६ ते १२ वर्षे) ९ ते १२ तास.किशोरवयीन मुले (१३ ते १७ वर्षे) ८ ते १० तास, प्रौढ (१८ वर्षांवरील) ७ ते ९ तास, हे आकडे आपल्याला झोपेच्या गरजेबद्दल एक ढोबळ कल्पना देतात. प्रमुख आरोग्य संस्थांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नवजात बालके, लहान मुले, किशोरवयीन आणि प्रौढांमध्ये ही गरज वेगवेगळी असते. विविध अभ्यासांनुसार यामध्ये थोडेफार बदल असू शकतात, पण हे आकडे प्रत्येक वयोगटासाठी सामान्यतः अचूक आहेत. बालकांचा मेंदू आणि शरीर वेगाने वाढते आणि त्यांच्या मज्जातंतूंचे जाळे तयार होत असते. या टप्प्यावर, झोप ही स्मरणशक्ती, शिकणे आणि रोगप्रतिकारशक्तीच्या विकासासाठी महत्त्वाची असते. मुले मोठी होतात, हे तसतसा मेंदूच्या विकासाचा वेग कमी होतो. जरी शिकणे व भावनिक व नियंत्रणासाठी झोप महत्त्वाची असली तरी, एकूण गरज कमी होते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# चकलांबा येथे महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

## बुद्धवंदना, भीमज्योती जन्मोत्सव,आर्केस्ट्रा कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

**क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व महामानव, बोधिसत्व भारतरत्न क्रांतीसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे मंगळवार दि.१४ रोजी सामाजिक परिवर्तन प्रतिष्ठान आयोजित 'सार्वजनिक भीमज्योती जन्मोत्सव' या भव्य- दिव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विविध माव्यवरांसह चकलांबा आणि परिसरातील नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. बुद्धवंदना, भीमज्योती आणि आर्केस्ट्रा या विविध कार्यक्रमास नागरिकांनी मोठी गर्दी केली.**




सामाजिक परिवर्तन प्रतिष्ठान आयोजित 'सार्वजनिक भीमज्योती जन्मोत्सव' कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक अध्यक्ष रोकडे, किशन रोकडे, यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक भीमज्योती जन्मोत्सव समिती अध्यक्ष सतीश घाडगे, ॲड. संदीप रोकडे डी.डी. रोकडे आदीच्या मार्गदर्शनाखाली प्रति वर्षाप्रमाणे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी प्रास्तविकता ॲड. संदीप रोकडे यांनी क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले व महामानव, भारतरत्न ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी भाषणात सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमात गेवराई तालुका भाजपाचे युवानेते यशराज बदामराव पंडीत, माजी जि.प. सदस्य विजयकुमार घाडगे, पं.स. सदस्य शेख तय्यब, आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास चकलांबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, पोलिस उपनिरीक्षक अजय पानपाटील, ह.भ.प. सखाराम महाराज तांगडे, ह.भ.प. परमेश्वर वाघमोडे, युवानेते जयदीप खेडकर, तय्यबभाई पठाण, भूमिपुत्र अर्बन संचालक पांडुरंग वावरे, बालनाईक तांडा सरपंच अंबादास सांगळे, चोरपुरी सरपंच दत्ताभाऊ शिंदे, सय्यद महेबुब कादरी, मुख्याध्यापक गरकळ, जनसेवा अर्बन, संचालक वामनभाऊ घारगे, ग्रामपंचायत सदस्य राजु नागरे, आदिनाथ खेडकर, सोमनाथ साळवे, नवनाथ साळवे, बाबासाहेब खेडकर, अर्धपिंपरी माजी सरपंच तुळशीराम साळवे, भारत मडके, ज्ञानेश्वर खरे, ग्रामसेवक शेंडकर, भारत घाडगे, अशोक डोंगरे, पांडुरंग बिचकुल, श्रद्धा कृष्णा गाडेकर, शरद घाडगे, बळीराम उनवणे, मेहबूब शेख, राधाकृष्ण खेडकर, अंशीराम जाधव, अशोक कोळसे, शरद खेडकर आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजनासाठी अध्यक्ष सतीश घाडगे, ॲड. संदीप रोकडे, डी.डी. रोकडे, प्रकाश खेडकर, शकील शेख, कुंडलिक गुंजाळ, विष्णू कुलाळ, श्रीकृष्ण खेडकर, अशोक वाव्हळ, श्रीराम जाधव, सागर साळवे, इरफान कादरी, गणेश बीडे आदीच्या परिश्रम घेतले. आर्केस्ट्रा'द्वारे प्रबोधन अमितकुमार प्रस्तुत 'न्यू परिवर्तनाचा वादळ वारा' या आर्केस्ट्रा तील कलावंतांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर आणि सामाजिक गीतातून उपस्थितांची मने जिंकली.

# पान १ वरून...

### शेतकऱ्यांचा उद्या

सामोरे जावे लागत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. गहू खरेदी तत्काळ सुरू करावी आणि गहू खरेदीचे नियम शिथील करावेत, या त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. या मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे.

------------

### महिला आरक्षण विधेयकाला

तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावानुसार, लोकसभेच्या एकूण जागा ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्यात येणार असून, त्यापैकी ८१५ जागा राज्यांसाठी आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी असतील.तसेच या विधेयकात मतदारसंघांच्या सीमांचे पुनर्रचना (डिलिमिटेशन) करण्याचाही विचार करण्यात आला आहे. महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देणे हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. या प्रक्रियेला गती देण्यासाठी केंद्र सरकार तीन वेगवेगळी विधेयके सादर करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे.

----------

### खरात प्रकरणाचे कनेक्शन थेट

घेऊन सांगते अभिजीत भांडे पाटील असे त्यांचे नाव असून ते एसआरएममध्ये होते. त्यांना एसआरएममधूनही पदमुक्त करून त्यांना पुन्हा त्यांच्या पूर्वीच्या ठिकाणी आणले आहे. यांना खरेतर पदमुक्त करणे गरजेचे आहे. त्यांना काढून टाकणे गरजेचे आहे, असे अंजली दमानिया म्हणाल्या. दीपक लोंढे हे जवळचे होते. हे केसरकरांच्याही जवळचे आहेत. त्यांचे १८९ कॉल आहेत. बाळासाहेब बोराडे यांचे १५६ कॉल आहेत. नंदकिशोर काठोरे हे डॉक्टर आहेत. १०६ कॉल आहेत. त्यांचा रोल बोलता येत नाही. पण विचित्र रोल आहे. सचिन सुंबाळे १७७ कॉल्स आहेत. मंगेश नव्हाळे ११० कॉल्स आहे. राहुल देशमुख, अविनाश पोटे, महेंद्र शेळके पाटील यांचाही रोल तपासला पाहिजे, असा खुलासा अंजली दमानिया यांनी केला. धक्कादायक बाब म्हणजे जवळजवळ तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, पीआय आणि एपीआय असे सात अधिकारी, दोन आरटीओ त्यात निमसे नावाचा व्यक्ती आहे. हे लोक खरातांना फोन का करायचे, शेकडो कॉल का केले, असा सवालही त्यांनी केला आहे.

------------

### एसटीला दररोज १.६ कोटींचा

एमएसआरटीसीचे अध्यक्ष, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना तोटा कमी करण्यासाठी व्यापक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. ३१ विभागांपैकी केवळ आठ विभाग जालना, परभणी, बुलढाणा, भंडारा, गडचिरोली, अकोला, धुळे आणि वर्धा नफ्यात होते. ही एक गंभीर चिंतेची बाब आहे. येत्या आर्थिक वर्षात योग्य नियोजनाद्वारे उपलब्ध बसेस आणि मनुष्यबळाचा अधिक कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे. आमचे मुख्य उद्दिष्ट १.५ कोटी ते २ कोटी रुपयांचा उर्वरित दैनंदिन तोटा भरून काढणे आहे, असे सरनाईक म्हणाले.

--------------

### आता शिंदे–केसरकरांची

असणे, हा काही गुन्हा होऊ शकत नाही. त्यामुळे केवळ प्रत्येक गोष्टीला राजकीय वळण देणे हे योग्य नाही, असे दीपक केसरकर यांनी सुषमा अंधारेंच्या आरोपावर म्हटले. एसआयटी आणि ईडीला त्यांचे काम करू द्या. जिथे जिथे त्यांना कोणाची नोंद मिळते, त्यावेळी त्यांनी चांगल्या-चांगल्या लोकांना बोलवलेले आहे. त्यामुळे माहिती घेण्यामध्ये काहीच चुकीचे नाही. माझा काही संबंध नसताना विनाकारण आमची नावं घेणे, केवळ आमची ओळख आहे म्हणून, आरोप करणे हे अत्यंत चुकीचे आहे, असेही केसरकर यांनी म्हटले आहे.

-----------

### पेट्रोल १८, डिझेल

असे कंपन्यांचे म्हणणे आहे. गेल्या महिन्यात उच्चांकी पातळीवर असताना या तिन्ही कंपन्यांना दररोज सुमारे २,४०० कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत होते. उत्पादन शुल्कात १० रुपयांची कपात केल्यानंतर हे नुकसान कमी होऊन १,६०० कोटी रुपयांवर आले आहे. प्रत्येक १० डॉलरच्या वाढीमुळे नुकसान प्रतिलिटर सुमारे सहा रुपयांनी वाढते, असे अहवालात म्हटले आहे. भारत आपल्या गरजेच्या सुमारे ८८ टक्के कच्चे तेल आयात करतो. यापैकी ४५ टक्के मध्य पूर्वेतून आणि ३५ टक्के रशियातून येते. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती केवळ तेल कंपन्यांसाठीच नव्हे, तर देशाच्या चालू खात्यातील तुटीसाठीही धोकादायक आहेत. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत ही तूट वाढून २० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकते, असा अंदाज आहे.

------------

### परभणीत पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे

पोलीस निरीक्षक गणेश कदम यांच्यासह फॉरेनसिक तज्ञांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, आरोपींचा शोध घेणे सुरू आहे. प्राथमिक तपासात हा प्रकार जुन्या वैमनस्यातून घडल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंतर सुजाता कॉलनी परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

----------

### राज्यात उष्णतेचा

येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांचे प्रमाण घटले असून कोरड्या हवामानामुळे तापमानात वाढ होत आहे. अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, बुलडाणा जिल्ह्यात २० तारखेपर्यंत तापमानाचा पारा सतत वाढत जाण्याची शक्यता आहे.

-------------

# पान ६ वरून...

### भीम जयंतीत पालिकेचे

नागरिकांच्या मिरवणुकीस अडथळा निर्माण केल्याबद्दल ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे. दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याशी सरळ खेळ करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करणे जिल्हाधिकारी यांच्यासाठी अत्यावश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. इशारा स्पष्ट ७ दिवसांत कारवाई नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य आंदोलन! वंचित बहुजन आघाडीने इतर सर्वपक्षीय संघटनांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे यावेळी अजय सरवदे, सिद्धार्थ शिनगारे, राजाभाऊ मोहले, सचिन आप्पा सोनवणे, दीपक कांबळे, निखिल सवाई, शामसुंदर जाधव, संतोष जोगदंड, धम्मपाल विद्यागर,रोहन मगर यांच्यासह असंख्य भीमसैनिक उपस्थित होते.

--------------

### कासारी पुलाचा 'कासवगती'ने सुरू पावसाळ्यापूर्वी

धोका आहे. विशेषतः शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि रुग्णवाहिका सेवांवर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. भोसले यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले आहे की, ठेकेदारावर तात्काळ कारवाई करून कामाला गती देण्यात यावी, अन्यथा पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीस आणि संभाव्य अपघातांना जबाबदार कोण, हा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे. सध्या नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचा सुर असून, प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास भविष्यात आंदोलनाचा इशाराही दिला जात आहे.

---------

### पेठ बीड पोलिसांनी ३५ कि.मी.

बसलेल्या आरोपीला पोलिसांनी ३५ कि.मी. पाठलाग करून ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपीवर यापूर्वी खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, मारहाण आणि अवैध दारू विक्री यांसारखे एकूण ५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने आरोपीला २० एप्रिल २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, पोलीस उपनिरीक्षक मन्सुर शहा, नितीन राठोड, अजित शिकेतोड, नितेश माने, शरद भारती, दीपक भोजे आणि चालक डोईफोडे यांनी केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रीतमकुमार पुजारी करत आहेत.

-------------

### पाटोद्यात विद्यार्थ्यांच्या

या बेकायदेशीर वाहतुकीकडे वाहतूक पोलिस आणि संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. केवळ कागदोपत्री नियम न ठेवता, रस्त्यावर उतरून अशा वाहनांची तपासणी करणे गरजेचे आहे. निष्काळजीपणा करणाऱ्या चालकांवर आणि शाळा प्रशासनावर कठोर कारवाई करण्याची मागणी आता सुज्ञ नागरिकांमधून होत आहे. वेळ निघून जाण्यापूर्वी प्रशासनाने आणि पालकांनी जागृत होणे गरजेचे आहे, अन्यथा एखादा मोठा अपघात झाल्याशिवाय यंत्रणेला जाग येणार नाही का? असा प्रश्न विचारला जात आहे.

------------

### पंडित दीनदयाळ उपाध्याय

घेऊन प्रदेश भाजपचे व उपस्थित सर्वच नेत्यांचे लक्ष वेधले. प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्य आमदार संजय केनेकर, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, आयुष्यमान भारतचे ओमप्रकाश शेटे, नवनाथ शिराळे, संजय आंधळे, भाग्यश्री ढाकणे, शांतीलाल डोरले, पवन मोगरेकर यांनी विविध विषय मांडत कार्यकर्त्यांना सखोल असे मार्गदर्शन केले.या प्रशिक्षण वर्गास वर्ग प्रमुख म्हणून अभय होके पाटील यांनी आपल्या मनोगतातून कार्यकर्त्यांना संबोधित केले , अभय होके यांनी अतिशय उत्कृष्टपणे काम करत या अभियानाचे वर्ग प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली.या प्रशिक्षण वर्गास उद्घाटक/अध्यक्ष म्हणून भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके व माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन मोगरेकर यांनी केले तर प्रास्ताविक माजलगाव शहर मंडळाचे भाजपा तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले व आभार प्रदर्शन दिपक मुंडे यांनी केले.१९८३ पासून भाजपाच्या अनेक नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी केलेला संघर्ष व त्यांचा इतिहास हा भव्य व सुंदर चित्र प्रदर्शनीतून मांडला.या अभियानास प्रमुख उपस्थिती अरुण राऊत,शिवाजी रांजवण,रूपाली कचरे,अमरनाथ खुरपे,डॉ अभिजीत सोळंके,दिपक मेंडके, सत्यनारायण उनवणे,ज्ञानेश्वर सरवदे,हनुमान कदम,ईश्वर खुरपे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांची होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी या वर्गाचे सहसंयोजक विनोद लड्डा,कैलास खुरपे,बाळासाहेब क्षिरसागर,अक्षय दळवे,उमेश जाधव, आनंद कुलकर्णी, रामेश्वर चव्हाण, विशाल शिंदे, नामदेव मुळे,सुभाष कांबळे,निरंजन वाघमारे,सुनील दळवे,बाबा जाधव, संतोष जाधव, असेफ इनामदार, संतोष सोळंके, अजीम पठाण, अमोल धारक, करण अलझेंडे, नारायण मेंडके, दत्ता महाजन,उमेश जाधव,रवी गायकवाड,शेख अनिस,हरिभाऊ नवले,प्रल्हाद दळवी,राम शिंदे, भरत जोशी,गोपाळ कुलकर्णी,विजय रांजवण,मनोज कोरडे व रवी वाकले यांनी सहकार्य केले.

-------------

### युगप्रवर्तक चषक पोलीस

अंतिम फेरीत इम्रान नाईक यांच्या नेतृत्वातील आय.के.एन.या बल्लाढ्य समजल्या जाणाऱ्या संघावार मात केली.आणि विजेतेपद पटकावले.बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या पोलीस प्रशासनाच्या संघाला ''युगप्रवर्तक चषक २०२६'' प्रदान करण्यात आला.तसेच स्पर्धेतील सामनाविराचा मान ओंकार थेटे यांनी,बेस्ट बॅटसमन पोलीस निरीक्षण राहुल सूर्यतळ यांनी व बेस्ट बॉलर सचिन मंजुळे यांनी पटकावला.विजेते व उपविजेते संघातील खेळाडूंना ट्रॉफी,सन्मानचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अमोल राऊत,डॉ.श्रीराम खळगे,जीवन नखाते,अमोल गायकवाड,परमेश्वर पांचाळ,प्रभाकर साळवे,गोरख उघडे,ममता गायकवाड,नितीन पुटवाड,शेख सलीम व संपूर्ण सामन्याची पंचगिरी अबू शेरा व ढकलू यांनी करून विशेष सहकार्य केले. या स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडा प्रमुख शेख मतीन व नितीन पुटवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार होते. कार्यक्रमाचे संचालन नारायण भाळशंकर यांनी सर प्रास्ताविक भारतभाऊ टाकणखार यांनी केले.कार्यक्रमास बाळासाहेब सोनसळे सतीश डोने,प्रमोद साळवे,आनंद गायकवाड,प्रा.रोहित शेटे,डॉ.सुहास टाकणखार,पत्रकार विष्णू उगले,परमेश्वर सोळंके,बालासाहेब आडगळे तसेच सर्व सहभागी खेळाडू,पोलीस आदींची उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करत,अशा उपक्रमांमुळे कर्मचारी वर्गात एकजूट,शिस्त आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते,असे मत व्यक्त केले.''युगप्रवर्तक चषक'' स्पर्धेमुळे शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असून,भविष्यातही अधिक मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आयोजित करण्याचा संकल्प आयोजक वसंतभाऊ टाकणखार, शिवाजी भाळशंकर,अभिमन्यू इबिते,राजकुमार सोनवणे, किरण शिंदे,प्रवीण जाधव,राजेंद्र सातपुते,राहुल खुणे,निलेश गावडे,अमोल राऊत,अजमुद्दीन खतीब,सुमेध घाडगे,प्रतीक स्वामी यांनी व्यक्त केला.

-----------------

### विठ्ठलगडावर अखंड हरीनाम

ह.भ.प.श्री अर्जुन महाराज लाड, ह.भ.प. गुरुवर्य श्री प्रकाश महाराज बोधले, ह.भ.प. महामंडलेश्वर श्री आमृतश्रम स्वामी आशा विविध मान्यवर कीर्तनकारांच्या उपस्थितीत भक्तांना अध्यात्मिक मेजवानी ची पर्वणी मिळनार असुन काल्याचे किर्तन ह.भ.प.वैराग्यमूर्ती रामकृष्ण महाराज रंधवे बापु यांचे होणार आहे. या भव्य सोहळ्याचे मुख्य आयोजक वैराग्यमूर्ती ह.भ.प. श्री रामकृष्ण महाराज रंधवे (बापू) असून त्यांच्या निस्वार्थ सेवेमुळे हा सप्ताह विशेष ठरला आहे. विशेष म्हणजे, त्यांनी आजपर्यंत कीर्तन सेवेबद्दल एक रुपयाही मानधन न घेता अखंड सेवा दिली असून त्यांच्या या अद्वितीय कार्याची नोंद वर्ल्ड ऑफ रेकॉर्ड बुकमध्ये झालेली आहे, ही अभिमानाची बाब आहे. या जीवनात माणसाला सुख – शांती समाधान नांदावा व मुक्ती मिळावी म्हणुन जागृतीची गरज आहे.मी सत चित आनंद स्वरूप आहे हा बोध व्हावा या करीता कथा कीर्तन असतात व सप्ताहाच्या माध्यमातून समाजात भक्ती, सद्भावना आणि शांततेचा संदेश दिला जात असून मोठ्या संख्येने भाविक यामध्ये सहभागी होत आहेत. सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन विठ्ठलगडाचे भक्तगण यांच्या तर्फे करण्यात आले असून सर्व भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य आयोजक व विठ्ठल गडाचे महंत ह.भ.प.श्री वैराग्यमूर्ती रामकृष्ण महाराज रंधवे (बापु)यांनी केले आहे.

-------

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरूवार दि.१६ एप्रिल २०२६



## नेकनूर येथील मूकबधिर शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

बीडः दि. १४ एप्रिल वार मंगळ वार रोजी नेकनूर येथील मूकबधिर निवासी शाळेत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक श्री फुलचंद लुचारे तसेच प्रमुख पाहुणे श्री सचिन राखुंडे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य हे पुढील कालावधीत मार्गदर्शक आहेत.समता आणि संविधान या मूलभूत तत्त्वावर आधारलेली त्यांची दूरदृष्टी आजही राष्ट्र उन्नतीचा भक्कम पाया ठरते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे संविधान. त्यांनी अत्यंत सखोल अभ्यास दूरदृष्टी आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीने ही राज्यघटना घडवली. या संविधानामुळे भारत केवळ स्वतंत्र राष्ट्र राहिला नाही तर एक सशक्त संघीय आणि सार्वभौम देश म्हणून जगासमोर उभा राहिला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण संघटन आणि संघर्ष यातील त्रिसूत्रीचा पुरस्कार केला. त्यांनी शिक्षणाला वैयक्तिक मर्यादित न ठेवता सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्र निर्मितीचे प्रभावी साधन मानले. भारत आज महासत्तेकडे आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे या प्रवासाची बीजे खऱ्या अर्थाने बाबासाहेबांनीच रोवली होती.

# मतदारसंघात खतटंचाई संदर्भात आ.सुरेश धस यांनी घेतली खरीप हंगाम आढावा बैठक

**आष्टी । प्रतिनिधी**

**आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर सर्वसमावेशक आढावा बैठक बुधवारी दुपारी आष्टी येथील तहसील कार्यालयात आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी हंगामाचे नियोजन, संभाव्य अडचणी आणि उपाययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यांचे तहसीलदार, जिल्हा कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सुरुवातीला संबंधित विभागांनी आपल्या-आपल्या कार्यक्षेत्रातील खरीप हंगामाच्या तयारीचा आढावा सादर केला.**




यावेळी आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, यंदाचा खरीप हंगाम अनेक आव्हानांनी भरलेला असण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे खत पुरवठ्यावर परिणाम होत असून, इराणअमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपी खतांचा तुटवडा जाणवू शकतो. परळी व अहिल्यानगर येथून अपेक्षित प्रमाणात खत उपलब्ध होत नसल्याची बाब व्यापाऱ्यांनी मांडली. या पार्श्वभूमीवर आष्टी येथे खतांचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी न्यू आष्टी रेल्वे स्थानकावर रॅक सुरू करण्यासाठी शासन स्तरावर लवकरच हालचाली करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, वाढत्या उष्णतेमुळे पावसाबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याचे तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी कमी पावसात तग धरणाऱ्या वाणांचा विचार करावा, तसेच पावसावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या बियाण्यांपासून सावध राहावे, असे आवाहनही करण्यात आले. कृषी विभागाने याबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबवण्याच्या सूचना आमदार धस यांनी दिल्या. बैठकीत राष्ट्रीय महामार्ग ५६१ (बीडअहिल्यानगर मार्ग) अंतर्गत पाटोदा तालुक्यातील नायगाव परिसरातील रस्त्याच्या कामांबाबतही चर्चा झाली. शेतकरी व स्थानिक नागरिकांच्या अडचणींची दखल घेत त्या मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच मुरघास (सिलेज) तयार करण्याच्या पद्धतीत बदल करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. भोत पद्धतीऐवजी जमिनीवर मुरघास करण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून नुकसान टाळता येईल. एकूणच, खरीप हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे, तसेच शेतकऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी (बीड), उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गरजे, मोहीम अधिकारी सय्यपा गरांडे, तहसीलदार वैशाली पाटील, निलावाड साहेब, घोळवे साहेब, गटविकास अधिकारी बागलाने, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, अमृत गांगर्डे, ओमकार शेळके, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक वल्लभ भोसले, कृषी अधिकारी नागसेन शिंदे, पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप, कृषी उत्पन्न बाजार समिती कडा चे सभापती रमजान तांबोळी आदी मान्यवर उपस्थित होते.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळा पाटोदा येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रम साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये दि.१४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मु.अ. मोरे सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्रीकांत लांडगे , शाळेचे माजी विद्यार्थी चिन्मय लांडगे, कु.ईश्वरी चापकानडे हे उपस्थित होते सर्वप्रथम अध्यक्ष,प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आल त्यानंतर कार्यक्रम सूत्रसंचालन श्री माताडे सर यांनी केले या कार्यक्रमांमध्ये शाळेतील इ.१ली ते इ.४ थी तील विद्यार्थ्यांची भाषण स्पर्धा घेण्यात आली यामध्ये इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी कु रागिनी ज्ञानेश्वर चापकानडे हिने प्रथम क्रमांक मिळवला व इयत्ता चौथीचा विद्यार्थी चि.सार्थक सुंदर शिंदे याने द्वितीय क्रमांक मिळवला . या जयंती उत्सव कार्यक्रमांमध्ये शाळेतील विद्यार्थी चि.समाधान गोकुळ जिरेकर ,चि. अभय वसंत मडावी ,चि. श्रेयश संजय गांगुर्डे कु. साक्षी सखाराम शिंदे, कु. शुभ्रा शुभम अंकुश, कु. वेदिका अरविंद सरोदे यांनी सहभाग नोंदविला. प्रमुख पाहुण्याच्या मनोगतामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा असे व्यक्त केले तर आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये मोरे सर यांनी व्यक्त केले की उध्दरली कोटी कुळे,भिमा तुझ्या जन्मामुळे भारताच्या पावन भूमीमध्ये या महामानवाने जन्म घेऊन देशासाठी समाजासाठी अहोरात्र कार्य केले समाजाला त्यांनी शिका ,संघटित व्हा ,संघर्ष करा हाअनमोल मंत्र दिला अशा या महामानवाचे विचार डोक्यात घेऊन मानवाने शिक्षणाकडे लक्ष दयावे. देवभोळ्या समाजाने आंबेडकर यांची दृष्टी घेऊन वाटचाल करावी तरच तुमची प्रगती होईल असे मत व्यक्त केले.जयंती विचारांनी साजरी व्हावी असा हेतू व्यक्त केला कार्यक्रमाच्या शेवटी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला .

## 'रक्ताचा रंग एकच' : पालीत भीम जयंतीनिमित्त सामाजिक एकतेचे प्रेरणादायी दर्शन

**पाली । प्रतिनिधी**

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पाली येथील नालंदा बुद्ध विहार येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात तब्बल ५१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मानवतेचा संदेश दिला.**

या रक्तदान शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध बांधवांनी एकत्र येत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे अनोखे उदाहरण घालून दिले. ''रक्ताचा रंग एकच'' हा संदेश देत सर्व समाजातील तरुणांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन व बुद्ध वंदनेने झाली.



त्यानंतर गावातील विविध घटकांतील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत रक्तदान केले. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजापुरते मर्यादित नव्हते, तर ते संपूर्ण राष्ट्राचे नेते होते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी एकत्र येऊन एखाद्याचे प्राण वाचवण्याचा संकल्प केला, हीच त्यांना खरी मानवंदना आहे.'' आजच्या काळात जिथे समाजात विभागणीची दरी निर्माण होताना दिसते, तिथे पाली येथील या उपक्रमाने एकतेचा आणि मानवतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. ''रक्ताला ना जात असते, ना धर्म'' ही भावना या शिबिरातून प्रभावीपणे अधोरेखित झाली. या उपक्रमामुळे पाली परिसरात उत्साहाचे आणि ऐक्याचे वातावरण निर्माण झाले असून, समाजमाध्यमांवरही या प्रेरणादायी उपक्रमाची जोरदार चर्चा रंगत आहे.



बीडः संपादक राजेंद्र होळकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करताना ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर ,संपादक नरेंद्र कांकरिया, संपादक संजय मालानी, संपादक विलास डोळसे,संपादक अभिमन्यू घरत, कार्यकारी संपादक सुभाष चौरे,पुण्यनगरी चे प्रतिनिधी अविनाश वाघिरकर ,प्रेस फोटोग्राफर शंकर सुरवसे ,मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, प्रसिद्धी प्रमुख संजय हंगे आदी उपस्थित होते.

## वडवणीत डॉ.आंबेडकर यांच्या नावाचा जयजयकार, शाही भोजनाला अभूतपूर्व गर्दी

### मुख्य रस्त्यावर निळ्या कमानीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले

**वडवणी । प्रतिनिधी**

**विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, जब तक चांद सूर्य रहेगा तब तक बाबा तुम्हारा नाम रहेगा यासह अन्य घोषणांनी आज सकाळी वडवणी शहर दुमदुमून गेले होते तर सकाळी दहा वाजता वडवणी शहरातील मुख्य आंबेडकर चौकामध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रथमचे पूजन व निळा ध्वजाचे ध्वजारोहण विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात यावे यानंतर या ठिकाणीच शाही स्नेह बोलण्याच्या कार्यक्रमाला सर्व समाज बांधवांनी अर्भुपूर्व गर्दी केली असून भोजनाला सुरुवात झाली आहे.**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आज मध्यरात्री बारा वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भीम ज्योत रॅली काढण्यात आली तर आज सकाळी दहा वाजता वडवणी शहरातील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकात निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करून प्रथमेचे विविध मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या जयघोषाने शहर नवचैतन्य निर्माण झाले होते तर शहराच्या मुख्य रस्त्यावर जयंती उत्सव समितीच्या वतीने निळ्या कमानेने सजवले होते याकडे वडवणी शहरासह तालुक्यातील जनतेचे लक्ष वेधून घेतले होते तर आज सकाळी दहा वाजल्यापासून विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकातच भव्य दिव्य मंडपाची उभारणी करून त्या ठिकाणी शाही भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाला सर्व समाज बांधवांनी अभूतपूर्व गर्दी करत उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे यावेळी जवळपास १५००० लोकांना जेवणाचा स्वाद घेता यावा. म्हणून स्वयंपाक बनवला आहे. तर नियोजनबद्ध कार्यक्रम करण्यासाठी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने विशेष लक्ष देऊन आहेत तर या कार्यक्रमाला समाज बांधवांकडून देखील सहकार्य लाभत आहे. तर या कार्यक्रमाला सर्वच राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच पोलीस प्रशासनाचे प्रमुख व इतर कर्मचारी व इतर सर्व घटकातील मान्यवरासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिथे देवाची भूमी, तिथे सुविधा पुरवा; राजकीय नेतृत्वाला धोका नाही-ह.भ.प.लक्ष्मण महाराज पाटील

### कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज संजीवन समाधी सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने सांगता

**आष्टी । प्रतिनिधी**

**वारकरी संप्रदाय हा मानवी जीवनाला मौलिक तत्त्वे आणि चांगुलपणाची दिशा देणारा अलौकिक विचार आहे.जिथे जिथे देवाची अर्थात संतांची भूमी आहे, तिथे राजकीय नेतृत्वाने सोयीसुविधा पुरवाव्यात असे केल्यास तुम्हाला कधीही धोका निर्माण होणार नाही असे परखड आणि मार्गदर्शक विचार आळंदी येथील प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प.लक्ष्मण महाराज पाटील यांनी व्यक्त केले.**

आष्टी तालुक्यातील कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि शिवमहापुराण कथेची बुधवारी दि. १५ एप्रिल रोजी काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. यावेळी अण्णासाहेब चौधरी,सतीशआबा शिंदे,सरपंच श्याम धस,अमोलराजे तरटे,चेअरमन शांतीलाल भोसले, अशोक पोकळे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सरपंच शालन अशोक मुळे, माजी सरपंच अदिकाताई लोखंडे, मोहन घुले, दत्ताभाऊ सायकड, मनोज धनवडे, सचिन वारंगुळे, कपिल अग्रवाल, शरद रेडेकर,शरद गर्जे,ह.भ.प.संतोष महाराज मोरे,ह.भ. प.श्रीहरी पुरी महाराज,ह.भ.प. ब्रह्मचैतन्य तावरे महाराज,ज्ञानदेव जगताप महाराज,ह. भ.प.उत्तम पोकळे, तुकाराम भोसले, अशोक काकडे, अशोक काकडे, बाळकृष्ण राऊत, मच्छिंद्र गाडे, भाऊसाहेब जाधव, मुरलीधर सुळे, दत्तात्रय खाडे, किशोर बोराडे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित हजारो भाविकांना मार्गदर्शन करताना ह.भ.प.पाटील महाराज यांनी अनेक संत महात्म्यांचे दृष्टांत देत उपस्थितांना प्रबोधन केले. संतांचे विचार मानवी जीवनासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगून ते म्हणाले की, ''इस्कॉनसारख्या शंभर वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या संप्रदायाने अल्पावधीत जागतिक स्तरावर प्रचंड प्रगती केली आहे. त्याच धर्तीवर हजारो वर्षांची उज्ज्वल परंपरा असलेल्या आपल्या वारकरी संप्रदायानेही आता कात टाकून उच्च स्तरावर अधिक व्यापक प्रगती साधण्याची गरज आहे. या अनुषंगाने त्यांनी विविध धार्मिक ग्रंथांतील दाखले देत संतभूमीचे महत्त्व अधोरेखित केले. ह.भ.प.पाटील महाराज



पुढे म्हणाले की, ''त्या'' भोंदू बाबाला भर चौकात गोळ्या घालून ठार मारले पाहिजे असे ह.भ.प.पाटील महाराज यांनी खळबळजनक आणि आक्रमक विधान केले आहे. सध्या सर्वत्र चर्चेचा आणि संतापाचा विषय ठरलेल्या 'भोंदू खरात महाराज' प्रकरणावर आता प्रबोधनकार आणि कीर्तनकारांमधूनही अत्यंत संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. समाजातील अज्ञानाचा आणि श्रद्धेचा बाजार मांडणाऱ्या या भोंदू बाबाच्या कृत्यांवर कडाडून टीका करताना ह.भ.प. पाटील महाराज यांनी अत्यंत परखड शब्दांत आपले मत व्यक्त केले आहे. ''भोंदू खरात महाराज याच्यापेक्षा त्याच्या नादी लागून तिथे जाणारे लोकच महामूर्ख आहेत,'' अशा शब्दांत त्यांनी अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या लोकांचे वाभाडे काढले.सध्या सुरू असलेल्या या ज्वलंत विषयावर बोलताना पाटील महाराज यांचा संताप अनावर झाला होता.भोंदू बाबांच्या वाढत्या सुळसुळाटावर आणि त्याला बळी पडणाऱ्या समाजावर त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.समाजातील अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी कायद्याचा धाक असणे आवश्यक आहेच,परंतु अशा गुन्हेगारांना मिळणारी शिक्षा समाजासाठी एक धडा असली पाहिजेअशी भावना त्यांनी बोलून दाखवली. या भोंदू बाबाच्या कृत्यांचा समाचार घेताना पाटील महाराजांनी एक अत्यंत आक्रमक आणि खळबळजनक भूमिका मांडली. ते म्हणाले की, अशा भोंदू आणि खरात बाबाला भर चौकात उभे करून गोळ्या घालून ठार मारले पाहिजे. हीच त्याच्या या नीच कृत्यांची खऱ्या अर्थाने योग्य शिक्षा ठरेल.ह.भ.प. पाटील महाराजांच्या या आक्रमक विधानामुळे सध्या मोठी चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे समाजातील काही लोक अशा भोंदूगिरीला बळी पडत असताना, प्रबोधन करणाऱ्या महाराजांकडून अशा कडक शब्दांत संताप व्यक्त होणे, हे सामान्य जनतेच्या मनातील खदखद दर्शवणारे आहे. पाटील महाराजांच्या या स्पष्ट आणि रोखठोक भूमिकेमुळे अंधश्रद्धा आणि अशा भोंदू बाबांचे स्तोम हा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून,आता या प्रकरणात प्रशासन काय कठोर पावले उचलते,याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. कासारी येथील या सप्ताहात गेल्या आठवडाभरापासून विविध धार्मिक उपक्रम राबविले गेले.आज बुधवारी झालेल्या काल्याच्या कीर्तनासाठी आष्टी शहरासह तालुक्यातील विविध गावे आणि वाड्या-वस्त्यांवरील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यात ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी, भजनी मंडळे, मृदंगाचार्य आणि गायक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सोहळ्यास परिसरातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी हजेरी लावली.



## माजलगाव येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सप्ताह उत्साहात संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशिर्वादाने शहरातील पाटील गल्ली येथील श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्रात श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नामजप यज्ञ सप्ताह ९ एप्रिल ते १५ एप्रिल दरम्यान मोठ्या प्रतिसादात व उत्साहात संपन्न झाला.दि. १५ एप्रिल बुधवार रोजी सकाळी १०:३० वाजता श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त सप्ताह सांगता महानैवेद्य आरतीने झाली. दरम्यानच्या काळात प्रासादिक, वेदतुल्य सात दिवसीय श्री गुरुचरित्र या ग्रंथाचे पारायण मोठ्या प्रतिसादात घेण्यात आले.या व्यतिरिक्त श्री स्वामी चरित्र सारामृत,श्री दुर्गा सप्तशती पाठ, सांस्कृतिक कार्यक्रम,औदुंबर प्रदक्षिणा मनन, पठण,चिंतन, हवन,ध्यान असे विविध उपक्रम अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर व श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग दिंडोरी दरबारच्य सूचनेनुसार श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सप्ताह संपन्न करण्यात आला.सर्व भाविक सेवेकऱ्यांनी आपापल्या घरुन शिरा,खिचडी तयार करून एकत्र करून महानैवेद्य आरतीनंतर शेकडो भाविकांनी मांदियाळी पध्दतीने महाप्रसादाचा लाभ घेतला.हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकऱ्यांनी प्रयत्न केले.

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

moghansawangi@gmail.com

PHno02483-27178

जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-४८

दिनांक:१५/४/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद तालेब मुतालीक रा.ता.घनसावंगी जि. जालना यांनी नामे मसरद बेगम भ्र. नईम अन्सारी रा. पाथरी ता. पाथरी जि. परभणी यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्र.५९१६ दि. ३१/१०/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्र. ३२४८ दिनांक: १३/११/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. मसरद वेगम भ्र. नईम अन्सारी रा. पाथरी ता. पाथरी जि. परभणी नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्र. १०९९ मधील क्षेत्र १११.५२ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व: सय्यद लाईफ सलीमोद्दिन यांची जागा,पश्चिम:सरकारी रस्ता,दक्षिण: शेख मोजम शेख इब्राहीम यांची जागा,उत्तरेस:आक्सा मस्जिद या वरील चतु:सिमा मधील १११.५२ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजून नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता बाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी

**जाहिरनामा**

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५७०/२०२६**
**जयश्री वायभट व इतर वि. निरंक**
**विधीज्ञ एस.आर. कुंभार**

मागणी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः१) जयश्री भ्र. पाराजी वायभट, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपरनाई पो. लिंबागणेश ता.जि.बीड,२) महादेव पि. पाराजी वायभट, वय. २६ वर्षे, धंदा-शेती. रा. वरीलप्रमाणे

३) आशाबाई भ्र. भागवत सवासे, वय ३२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. कमान पो. वसई ता. जि.पालघर, ४) स्वाती भ्र. विशाल जालन, वय-२५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. डोकेवाडी, ता. भुम, जि.धाराशिव,५) श्रीकन्या भ्र. दत्तात्रय शिंदे, वय-३० वर्षे, धंदा-घरकाम, रा. वैद्यकिन्ही ता. पाटोदा, जि. बीड, ६) शिवबाई भ्र. आश्रुबा वायभट, वय-८२ वर्ष, धंदा-घरकाम, रा. पिंपरनाई पो. लिंबागणेश ता. जि. बीड वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे पाराजी पि. आश्रुबा वायभट हे दिनांक २९/११/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क.२ हा मयताचा मुलगा आहे तसेच अर्जदार क. ३ ते ५ या मयताच्या विवाहित मुली आहेत व अर्जदार क्र. ६ ही मयताची आई आहे. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे पाराजी पि. आत्रुबा वायभट यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्याना सदरहु मयत पाराजी पि. आश्रुबा वायभट यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोद घ्यावी,

सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०६/२०२६ आहे.

आज दिनांक १३/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले

**स्वाक्षरित**
**क लिपीक**
**३ रे सह दिवाणी**
**न्यायालय व स्तर बीड**

**स्वाक्षरित**
**आदेशावरून**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

**जाहिरनामा**

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ४९७/२०२६**
**साखरबाई मस्के व इतर वि. निरंक**
**विधीज्ञ व्ही.एस.फाटक**

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) साखरबाई भ्र. गिरधारी मस्के, वय-८३ वर्षे, धंदा घरकाम, रा. मंझेरी हवेली ता. जि. बीड, २) सोजरबाई भ्र. प्रभु मस्के, वय-७३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. शिदोड ता. जि. बीड, (३) सखुबाई भ्र. बाबासाहेब मस्के, वय-६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. मंझेरी हवेली ता.जि.बीड, ४) बारकाबाई भ्र. विश्वनाथ मस्के, वय-६७ वर्षे, धंदा घरकाम, रा. मंझेरी हवेली ता. जि.बीड, (५) द्वारकाबाई भ्र. नानासाहेब ससाणे, वय-६६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. इंदिरा नगर, बीड, ता. जि.बीड

वरील अर्जदार यानी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे ज्याअर्थी मयत नामे कस्तुराबाई भ्र. लक्ष्मण भांगे यांचे निधन झालेले आहे. मयतांच्या नंतर अर्जदार यांना शासकीय निमशासकीय व कार्यालयीन उपभोगाकरिता सदर वारस प्रमापत्राची आवश्यकता आहे. त्या अर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरहू अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत कस्तुराबाई भ्र. लक्ष्मण भागे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/०५/२०२६ आहे.

आज दिनांक ०४/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**स्वाक्षरित**
**क लिपीक**
**३ रे सह दिवाणी**
**न्यायालय व स्तर बीड**

**स्वाक्षरित**
**आदेशावरून**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि.१६ एप्रिल २०२६


# खताच्या अनधिकृत साठेबाजीला बसणार चाप

## कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीतच खतांची विक्री



युरिया आणि डीएपी खतांच्या वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी आता कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीतच खतांची विक्री आणि पावती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे खतांचा अकृषक कामांसाठी होणारा वापर आणि अनधिकृत साठेबाजीला मोठा चाप बसणार आहे.राज्यात अनेकदा युरियाचा औद्योगिक कारणांसाठी गैरवापर होतो किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या दराने विक्री केली जाते. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी नवीन आदेश निर्गमित केले आहेत. ज्या विक्रेत्यांकडे २० मेट्रिक टन किंवा त्यापेक्षा जास्त युरिया व डीएपीचा साठा आधीच उपलब्ध आहे, त्यांना नवीन साठा दिला जाणार नाही. तसेच, एका जिल्ह्याचे खत दुसऱ्या जिल्ह्यात विकण्यासाठी आता जिल्हा कृषी विकास अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य असेल. खत विक्रीसोबत अनेकदा शेतकऱ्यांवर नको असलेली इतर उत्पादने (लिंकिंग) लादली जातात. हे रोखण्यासाठी आता कडक पावले उचलली गेली आहेत. कोणत्याही किरकोळ विक्रेत्याकडे खताची गाडी पोहोचण्यापूर्वी त्यांना संबंधित सहायक कृषी अधिकाऱ्याशी संपर्क साधावा लागेल. त्यांच्या देखरेखीखालीच साठ्याची नोंदणी आणि वितरण केले जाईल. या नवीन कार्यपद्धतीची अंमलबजावणी २० एप्रिल २०२६ पासून संपूर्ण राज्यात होणार आहे. यासंदर्भात १५ एप्रिलपर्यंत सर्व तालुका कृषी अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, जर खताचा साठा सुटीच्या दिवशी आला, तर कर्मचारी व्हिडिओ कॉलद्वारे पडताळणी करू शकतील. मात्र, त्यानंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी नोंदवहीवर प्रत्यक्ष सही करणे बंधनकारक असेल.

नवीन नियमावली काय सांगते? : २० टनांहून अधिक साठा असलेल्या विक्रेत्यांना नवीन खत मिळणार नाही. कृषी कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखालीच खत विक्रीची पावती होणार. पूर्वपरवानगीशिवाय दुसऱ्या जिल्ह्यात खत विक्री करता येणार नाही. सुटीच्या दिवशी व्हिडिओ कॉलद्वारे साठ्याची पडताळणी शक्य. कृषी विभागाच्या या वॉचमुळे यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना खतांसाठी पायपीट करावी लागणार नाही आणि काळाबाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# पावसाळ्यापूर्वी जनावरांना द्या या लसी !



पशुपालकांनो पावसाळा आणि विविध आजार हे जणू समीकरणच असते मग ते मानवाबाबत असो किंवा जनावरांबाबत त्यामुळे पशुपालकांनो पावसाळा सुरु होण्यापूर्वी जनावरांचे लसीकरण करणे महत्वाचे आहे. जनावरांना कोणत्याही रोगाची बाधा झाल्यांनतर त्यांच्या उत्पादनक्षमतेवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. जीवघेण्या रोगांपासून बचाव करण्यासाठी जनावरांचे वेळेत लसीकरण गरजेचे आहे.

या रोगांविरोधात करा लसीकरण :

पावसाळ्यापूर्वी मोठ्या जनावरांमध्ये घटसर्प, फऱ्या, फाशी आणि सांसर्गिक गर्भपात या रोगाविरुद्ध तर शेळ्या,मेंढ्यामध्ये पीपीआर, आंत्रविषार, देवी आणि घटसर्पविरुद्ध लसीकरण करणे गरजेचे ठरते. लसीकरण नेहमी रोगाची साथ येण्याआधीच करावे. कारण लस टोचल्यानंतर जनावरांच्या शरीरात रोगप्रतिकारशक्ती तयार होण्यास १५ दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे रोगाची बाधा झाल्यानंतर किंवा साथ आल्यानंतर लसीकरण करणे फायद्याचे ठरत नाही.

लसीकरण करण्यापूर्वी अशी घ्या काळजी :

लसीकरण करण्याआधी सर्व जनावरांना एक आठवडा आधी जंतनिर्मूलनाचे औषध दिले पाहिजे. यासोबतच जनावरांच्या शरीरावरील तसेच गोठ्यातील गोचीड, गोमाशी यांचाही बंदोबस्त करावा. जनावरांना आहारातून क्षार-मिश्रणांचा व जीवनसत्त्वाचा पुरवठा करावा. यामुळे जनावरांना टोचलेल्या लसीतून चांगल्या प्रकारची रोगप्रतिबंधक शक्ती निर्माण होऊन योग्य परिणाम दिसून येतो. लसीकरणासाठी नेहमी नामांकित कंपनीची लस निवडावी.या लसीवर योग्य संशोधन आणि चाचण्या झालेल्या असतात. लस योग्य तापमानात म्हणजे कोल्ड चेनमध्ये ठेवूनच लसीकरण करणे गरजेचे आहे.

जनावरांना लागणाऱ्या बहुतांश लसी या नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात उपलब्ध असतात. काही कारणामुळे लस उपलब्ध नसल्यास पशुवैद्यकाच्या सल्ल्याने बाजारातून उपलब्ध करून घ्यावी.

# फळे कृत्रिमरित्या पिकवण्याचे सुरक्षित आणि सोपे मार्ग

वेळेआधी फळी पिकवण्याचे अनेक मार्ग आहेत, अशाप्रकारे सर्वात सुरक्षित आणि सर्वात सोपी पारंपारिक आणि पिकवण्याची पद्धत आहे, ज्यामुळे फळ निरोगी राहते आणि त्याची गुणवत्ता खराब होत नाही.

आपल्या देशात फळे अनेक प्रकारे पिकवली जातात. फळे पिकवण्यासाठी अनेक आधुनिक तंत्रे देखील प्रभावित ठरली आहेत, परंतु फळे पिकवण्याचे जुने घरगुती तंत्र नेहमीच चर्चेत राहतात. यात फळे पारंपारिक आणि पिकवण्याविषयी जाणून घेतल्यास याचा चांगला फायदा होतो.

फळे पिकविण्याच्या पारंपारिक पद्धती :

१) प्राचीन काळी फळे पिकवण्यासाठी घरगुती आणि पारंपारिक पद्धती वापरल्या जात होत्या. जे अजूनही बहुतेक लोक करतात. काही व्यापारी परवटमध्ये फळे दाबून ठेवतात. ही पद्धत अत्यंत सुरक्षित आणि कमी खर्चिक आहे, परंतु यास जास्त वेळ लागतो. २) याशिवाय फळे गोणी,पारा, पेंढा यामध्ये पिकवण्यासाठी ठेवल्याने फळे वेळेपूर्वी पिकतात किंवा फळ कागदात गुंडाळून ठेवल्याने फळ चांगले पिकते.

फळ पिकवण्याचे तंत्र :

हे एक आधुनिक तंत्रज्ञान आहे ज्याद्वारे फळे वेळेपूर्वी पिकतात. हे बहुतेक मोठ्या फळ विक्रेत्यांकडून वापरले जाते. या तंत्राने फळे पिकवण्यासाठी लहान खोली असलेली शीतगृह तयार केले जाते. या चेंबरमध्ये इथिलिन वायू सोडला जातो. त्यामुळे फळे लवकर पिकतात त्यामुळे फळांना कोणत्याही प्रकारचा धोका होत नाही. यावर शासनाकडून सुमारे ३५ ते ५० टक्के अनुदान आहे शेतकऱ्यांना दिले जाते. हे तंत्र आंबा, पपई आणि केळी शिजवण्यासाठी अधिक वापरले जाते.

फळे पिकण्यास किती वेळ लागतो :

या पद्धतींनी फळे ४ ते ५ दिवसांत पिकण्यास तयार होतात आणि त्यांची गुणवत्ता ही चांगली असते.



# जमिनीनुसार ठरवा लागवडीसाठी योग्य सोयाबीन वाण!

लागवडी अगोदर जाणून घ्या कृषी तज्ज्ञांचा सल्ला खरीपात घेतले जाणारे महत्त्वाचे पीक म्हणजे सोयाबीन. बहुतेक शेतकरी सोयाबीन लागवड (करण्याच्या तयारीत असतील आणि त्यासाठी वेगवेगळ्या वाणांचे सोयाबीन बियाणे विकत घेत असतील. सोयाबीन लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आहे की त्यांनी जमिनीच्या प्रकारानुसार सोयाबीनच्या कोणत्या वाणाची पेरणी केली पाहिजे हे लक्षात घ्यावे.

जमिनीनुसार सोयाबीन वाणाची निवड :

कृषी तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकरी बांधवांनी त्यांच्या जमिनीच्या मगदूरानुसार सोयाबीन वाणाची निवड केली पाहिजे.

हलकी जमीन - हलकी जमीन असेल तर ८५ ते ९५ दिवसात कापणीसाठी तयार होणाऱ्या सोयाबीन वाणाची निवड केली पाहिजे. या जमिनीत लागवडीसाठी जे.एस.-९३०५, पी.के. व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस-१००३९), एम.ए.यु.एस.-७२५, एम.ए.सी.एस. -१४६० आर.व्ही.एस.एम.-१८, एम.ए.यु. एस-१५८, एम. ए.यु.एस.-६१२, जे.एस. -३३५ या सोयाबीनच्या जातींची निवड करावी.

मध्यम जमीन - अशा जमिनीत शेतकऱ्यांनी ९५ ते १०० दिवसात हार्वेस्टिंग साठी तयार होणाऱ्या वाणाची निवड केली पाहिजे.



हलकी ते मध्यम जमीन - अशी जमीन असल्यास जे.एस.- ९३०५, पी.के. व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस-१००३९), एम.ए.यु.एस.-७२५, एम.ए.सी.एस.-१४६० आर.व्ही.एस.एम.-१८, एम.ए.यु.एस-१५८, एम. ए.यु.एस.- ६१२, जे.एस. ३३५ या सोयाबीनच्या जातींची निवड करायला काही हरकत नाही.

भारी जमीन - अशा जमिनीत मध्यम ते उशिरा येणारे वाण निवडावे. भारी जमीन असेल आणि शाश्वत पाण्याची उपलब्धता असेल तेव्हाच उशिरा येणाऱ्या वाणाची निवड करावी. जर भारी जमीन असेल आणि पाण्याची सोय नसेल तर मध्यम कालावधीत हार्वेस्टिंग साठी तयार होणाऱ्या वाणाची निवड करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. भारी जमिनीसाठी शेतकरी बांधव फुले किमया, फुले संगम, फुले दुर्वा, एम. ए.यु.एस-७१, एम. ए.यु.एस- ६१२, फुले कल्याणी, तसेच पी.के.व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस - १००३९) या सोयाबीन जातींची निवड करू शकतात.

सोयाबीन वाण लागवडीसंबंधी महत्त्वाची सूचना :शेतकऱ्यांनी आपल्याकडील सर्वच क्षेत्रावर फक्त एका प्रकारचे वाण लावणे टाळावे. म्हणजेच पाच एकर क्षेत्र असेल तर त्यापैकी काही क्षेत्रावर वेगळ्या जातीची आणि काही क्षेत्रावर वेगळ्या जातीची लागवड करावी. जेणेकरून शेतकर्यांना एका जातीपासून चांगले उत्पादन मिळाले नाही तर दुसर्या जातीपासून चांगले उत्पादन मिळेल. यामुळे शेतकर्यांना तोटा सहन करावा लागणार नाही. तुम्ही तुमच्या जमिनीच्या मगदूराप्रमाणे तुमच्या क्षेत्रात दोन-तीन प्रकारच्या जातींची लागवड केल्यास तुम्हाला निश्चितच चांगले उत्पादन आणि उत्पन्न मिळू शकणार आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७३ : मराठा साम्राज्याचे सरनौबत प्रतापराव गुजर यांनी बहलोलखान पठाणाविरुद्ध मोठी लढाई जिंकली.
१८९२ : जनरल इलेक्ट्रिक कंपनीची स्थापना झाली.
१८९५ : साली स्वातंत्र्यपूर्व भारतातील थोर समाजसुधारक व क्रांतिकारक लोकमान्य टिळक यांनी सर्वप्रथम कोकणातील रायगड किल्ल्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज याची जयंती साजरी केली.
१९१२ : आर. एम. एस. टायटॅनिक हे जहाज उत्तर अटलांटिक महासागरात बुडाले.
१९२३ : मधुमेह असणा-यांना इन्सूलिन वापरण्यासाठी सामान्यतः उपलब्ध झाले.
१९४० : दुसरे महयुद्ध नाझी जर्मनीच्या ताब्यात असलेल्या नॉर्वेतील नॉर्विक शहरावर दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी हल्ला सुरू केला.
१९९४ : भारताने गॅट करारास मान्यता दिली.
१९९७ : मक्केपासून सहा किमी अंतरावरील मिना (सौदी अरेबिया) येथे हज यात्रेकरुंच्या तंबूला आग लागून किमान ३०० जण मृत्युमुखी पडले.
१९९८ : थम्पी गुरु म्हणून प्रसिद्ध असलेले फ्रेडरिक लेंज यांचे निधन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४५२ : लियोनार्दो दा व्हिंची, इटालियन गणितज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, चित्रकार.
१४६९ : गुरू नानक देव शिख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू (मृत्यू: २२ सप्टेंबर १५३९)
१५६३ : शिखांचे पाचवे गुरु गुरु अर्जुन देव यांचा जन्मदिन.
१७०७ : स्विस गणितज्ञ लिओनार्ड ऑयलर यांचा जन्म. (मृत्यू: १८ सप्टेंबर १७८३)
१७४१ : चार्ल्स विल्सन पील अमेरिकन चित्रकार, निसर्गवैज्ञानिक व सैनिक (मृत्यू: २२ फेब्रुवारी १८२७)
१८९३ : नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक चरित्रकार, टीकाकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक (मृत्यू: २१ डिसेंबर १९७९)
१८९४ : निकिता क्रूश्चेव्ह सोविएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ११ सप्टेंबर १९७१)
१९०१ : अजय मुखर्जी भारतीय राजकारणी यांचा जन्म.
१९१२ : मल्हार सदाशिव तथा 'बाबूराव' पारखे उद्योजक व वेदाभ्यासक (मृत्यू: १३ जानेवारी १९९७)
१९१२ : किम सुंग (दुसरे) उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ८ जुलै १९९४)
१९२२ : गीतकार हसरत जयपुरी यांचा जन्म. (मृत्यू: १७ सप्टेंबर १९९९)
१९३२ : कवी सुरेश भट यांचा जन्म. (मृत्यू: १४ मार्च २००३)
१९४० : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय शिखर घराण्यातील शास्त्रीय गायक व सारंगी वादक उस्ताद सुलतान खान यांचा जन्मदिन.
१९६३ : भारतीय क्रिकेटपटू मनोज प्रभाकर यांचा जन्म.
१९७२ : प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्या, क्रिकेट ग्लॅमर, फॅशन मूर्ती मंदिरा बेदी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९४ : मोरेश्वर रामचंद्र पराडकर उर्फ 'मोरोपंत' पंडीतकवी चैत्र शु. १५ (जन्म: ? ? १७२९)
१८६५ : अब्राहम लिंकन, अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा राष्ट्राध्यक्ष.
१९१२ : जगप्रसिध्द टायटॅनिक बोटीला धक्का लागून जलसमाधी मिळाल्याने अनेक लोकांचा मृत्यू.
१९१२ : एडवर्ड जे. स्मिथ आर. एम. एस. टायटॅनिक जहाजाचा कप्तान (जन्म: २७ जानेवारी १८५०)
१९८० : जेआँ-पॉल सार्त्र फ्रेन्च लेखक, कवी, तत्त्वज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २१ जून १९०५)
१९९० : ग्रेटा लोविसा गुस्ताव्हसन ऊर्फ 'ग्रेटा गार्बो' हॉलिवूड अभिनेत्री (जन्म: १८ सप्टेंबर १९०५)
१९९५ : पंडित लीलाधर जोशी तत्कालीन मध्यभारत राज्याचे पहिले मुख्यमंत्री (जन्म:)
१९९८ : पॉल पॉट कंबोडियातील २० लाख नागरिकांच्या हत्याकांडास जबाबदार असणारा 'ख्मेर रुज'चा नेता (जन्म: १९ मे १९२५)
२०१३ : वि. रा. करंदीकर संत साहित्याचे अभ्यासक (जन्म: २७ ऑगस्ट १९१९)

# जनावरांमधील वंध्यत्वाची कारणे आणि उपाय

जनावरांमध्ये वंध्यत्व आल्याने दुग्धव्यवसायात मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत असल्याची तक्रार अनेकांची आहे. पशुपालन व्यवसायातील बहुतांश अपयशामागे वंध्यत्व हे सर्वात मोठे कारण आहे. अशा स्थितीत अनेक शेतकरी आणि पशुपालक त्याच्या समस्या आणि उपायाबाबत योग्य माहिती नसल्यामुळे नुकसान सोसतात. जनावरांमध्ये वंध्यत्वाची मुख्य कारणे : क्रिप्टोर्चिडिज्म - या स्थितीत वृषण अंडकोषात उतरू शकत नाहीत. हे एकतर्फी किंवा द्विपक्षीय असू शकते. उतरत्या वृषण उच्च शरीराच्या तापमानास सामोरे जातात, परिणामी ते शुक्राणू तयार करण्यास असमर्थ असतात. स्क्रोटल हर्निया - या स्थितीत अंडकोष खाली येतो. ज्यामुळे रक्त पुरवठ्यात बाधा येते. आकस्मिक कारण - यामध्ये प्राण्याला तात्पुरते किंवा कायमस्वरूपी प्रजननापासून दूर ठेवणाऱ्या कोणत्याही यांत्रिक दुखापतीचे परिणाम समाविष्ट आहेत. त्वरीत आणि विशेषज्ञ उपचार दिल्यास हे सहसा बरे होऊ शकतात.

रोग संबंधित कारणे : विविध जीवाणूजन्य, विषाणूजन्य किंवा प्रोटोझोल रोगांमुळे गर्भपात होऊ शकतो आणि प्रजनन क्षमता कमी होऊ शकते. त्यापैकी ब्रुसेलोसिस, लेप्टोस्पायरोसिस, (बॅक्टेरिया), ट्रायकोमोनास (प्रोटोझोल) हे महत्त्वाचे आहेत. याशिवाय इतरही अनेक कारणे असू शकतात जसे पोषक तत्वांचा अभाव, काळजी घेण्यात निष्काळजीपणा, हवामानाचा प्रभाव इत्यादी.

जनावरांमधील वंध्यत्वाचे व्यवस्थापन आणि उपचार - उन्हाळ्यात योग्य वेळी गर्भधारणा करा. प्रदीर्घ उष्णतेमुळे गर्भधारणेसाठी पुनरावृत्ती आवश्यक असू शकते. उष्णता शोधण्यासाठी निरीक्षण आवश्यक आहे, विशेषतः म्हशींमध्ये. प्राण्याला त्याच्या जन्मापासूनच योग्य पोषण द्या. पुरेशा प्रमाणात खनिज मिश्रण द्यावे.

# उच्चशिक्षित तरुणी कुक्कुटपालनातून बनली यशस्वी उद्योजिका

जालना। प्रतिनिधी

नोकरीच्या मागे धावण्यापेक्षा स्वतःचा उद्योग उभा करून इतरांना रोजगार देण्याचे स्वप्न अनेक तरुण पाहतात, मात्र ते प्रत्यक्षात उतरवणारे कमीच असतात. जालना जिल्ह्यातील गोलापांगरी येथील अंकिता मोरे पाटील या उच्चशिक्षित तरुणीने हे स्वप्न केवळ सत्यात उतरवले नाही, तर कुक्कुटपालनाच्या व्यवसायातून यशाचे सोनं करून दाखवलं आहे. बी.एस्सी. ॲग्रीकल्चरनंतर आता एल.एल.बी.चे शिक्षण घेणाऱ्या अंकिता मोरे यांनी काही वर्षांपासून कुक्कुटपालनाचा यशस्वी फॉर्म्युला राबवत आज ५ हजार गावरान कोंबड्यांचे साम्राज्य उभे केले आहे. केवळ १० महिन्यात २६ लाखांचे उत्पन्न मिळवून त्यांनी शेतीपूरक व्यवसायातील नवी वाट दाखवून दिली आहे.

कोविडच्या संकटात शोधली संधी :सन २०२० मध्ये जेव्हा संपूर्ण जग लॉकडाऊनमुळे ठप्प होते, तेव्हा अंकिता यांनी या संकटाचे संधीत रूपांतर करण्याचे ठरवले. घरातूनच काहीतरी वेगळे करण्याची इच्छा आणि घरच्यांच्या भक्कम पाठबळामुळे त्यांनी कुक्कुटपालनात पाऊल ठेवले. जिजामाता कृषी भूषण प्राप्त सौ. छायाताई मोरे यांचा आदर्श समोर ठेवत, अंकिता यांनी ३५ एकर वडिलोपार्जित शेतीला आधुनिक जोडधंद्याची जोड दिली.



रिकाम्या गोठ्यातून व्यवसायाची भरारी :-सुरवातीला त्यांच्याकडे गाईंचा गोठा रिकामा होता. अंकिता यांनी याच गोठ्याचे रूपांतर पोल्ट्री शेडमध्ये केले. पक्षी वाढल्यानंतर त्यांनी द्राक्षाच्या बागेतील अँगलचा वापर करून कमी खर्चात दुसरे शेड उभारले. खर्च कमी आणि नफा जास्त हे सूत्र त्यांनी पहिल्या दिवसापासून अंमलात आणले.

स्वतःच झाल्या डॉक्टर आणि मॅन्युफॅक्चरर अंकिता यांनी केवळ ५०० पक्ष्यांपासून सुरुवात केली. पहिले लसीकरण १४ व्या दिवशी तर दुसरे लसीकरण २१ व्या दिवशी करावे लागते. कृषी पदवीधर असल्याने त्यांनी लसीकरणासाठी बाहेरील डॉक्टरांवर अवलंबून न राहता स्वतःच ब्रूडिंग आणि लसीकरण केले. बाहेरचे खाद्य महाग पडत असल्याने त्यांनी स्वतःचा फीड फॉर्म्युला तयार केला. मक्याचा भरडा, डीओसी आणि ५० टक्के हिरवा चारा (शेवगा, दुधी भोपळा, लसूण घास) यांचा वापर करून त्यांनी खाद्याचा खर्च निम्म्यावर आणला. मुक्त संचार पध्दतीचा अवलंब करीत कोंबड्यांना शेतात मोकळे सोडले जाते, ज्यामुळे त्या नैसर्गिक कीड-अळ्या खातात आणि सुदृढ राहतात. रात्री या कोंबड्या शेवग्याच्या झाडावरच मुक्कामाला असतात.

२७ हजार शेतकऱ्यांना मोफत धडा : अंकिता यांनी केवळ स्वतःची प्रगती केली नाही, तर एकात्मिक मुक्त-श्रेणी पोल्ट्री मॉडेल विकसित केले. गेल्या ३-४ महिन्यांत त्यांनी २७ हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. आयसीएआर, कृषी विज्ञान केंद्र खरपुडी आणि बीएआयएफ सारख्या संस्थांच्या मदतीने त्या महिला शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देत आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची जिल्हा आढावा बैठक संपन्न

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) पार्टीची आढावा बैठक सोमवार (दि.१३) रोजी जिल्हा कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शकुंतला कदम, शहाआलम खान,परतूर-मंठा विधानसभा अध्यक्ष भाऊसाहेब गोरे, लक्ष्मण दळवी, वंदना खांडेभराड, केशवराव जंजाळ, मंगला पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, राष्ट्रवादी किसान सभेचे अध्यक्ष रज्जाक भाई यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी या आढावा बैठकीमध्ये पक्ष वाढीसाठी व येणाऱ्या कालावधी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकी संदर्भात चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. पक्षातील विधान परिषदेच्या जागेवर जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांना संधी देण्यात यावी असा ठराव यावेळी घेण्यात आला. व तशी मागणी पक्षश्रेष्ठीकडे करण्यात यावी असे सर्वांमध्ये ठरले. तसेच जिल्ह्यामध्ये पक्ष वाढीसाठी नवीन सदस्यांची नोंदणी आणि तरुणांचा सहभाग वाढवणे. प्रत्येक मतदान केंद्रावर १० ते १५ कार्यकर्त्यांची सक्षम टीम तयार करणे. युवक, महिला, विद्यार्थी आणि सामाजिक न्याय विभागाच्या कामाचा आढावा, पक्षाचे विचार आणि केलेली कामे फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवणे.गाव तिथे शाखा आणि घर तिथे कार्यकर्ता या मोहिमेअंतर्गत गाठीभेटी वाढवणे. अशा



अनेक मुद्द्यांवर यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी तालुकाध्यक्ष कैलास मदन, लक्ष्मणराव कंटुले, दिलीप चव्हाण, संतोष ढेंगळे, दत्तू पाटील अंभोरे, बाबासाहेब घाडगे, सतीश धुपे, ज्ञानेश्वर गाडेकर, सोपान तेलगड,शिवचरण बाळराज,सतीश वाव्हुळे, अमोल खरात, रामभाऊ घोगरे,विठ्ठलराव बरकुले, अण्णासाहेब खंदारे,संभाजी खंदारे, महिला शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड, ओबीसी प्रदेश सरचिटणीस अब्दुल हाफीज , ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष मयूर गाडेकर, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, भोकरदन तालुका अध्यक्ष सुरेश सपाटे, गणेश नवपुते, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ।। थोडक्यात



घनसावंगी :अबंड तालुक्यात भाजपा पक्षाचा वटवृक्षासारखा विस्तार करावा यासाठी डा रमेश तारगे यांनी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीष राव घाटगे यांना वडाचे झाड देऊन वाढदिवसाचे अभिष्टचिंतन केले



जालना: महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. शिवेंद्रराजे भोसले जालना जिल्हा दौऱ्यावर आले असता भोकरदन येथील निवासस्थानी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी त्यांचे उत्स्फूर्त व मनपूर्वक स्वागत केले. यावेळी आ. संतोष दानवे व श्री. प्रतिक दानवे यांची उपस्थित होते.

## वरठाण चौफुली येथे तब्बल बारा तास रास्ता रोको आंदोलन

संभाजीनगर। प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील वरठाण येथील चौफुलीवर लावण्यात आलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बॅनरची अज्ञात समाजकंटकाने विटंबना केली होती. ही घटना रविवार (दि.१२) रात्री दहा वाजता समाजबांधवांच्या लक्षात आल्यावर समाजबांधव वरठाण चौफुलीवर जमा झाले. राज्य रस्ता क्र.२४ वर तब्बल बारा तास रास्ता रोको आंदोलन करत या घटनेचा निषेध केला.सदरील घटनेबाबत बनोटी चौकीत रीतसर तक्रार देण्यात आली. रात्रीच्या मुक्कामी असलेल्या बसेस पाचोरा सिल्लोड, चाळीसगाव सोयगाव,हनुमंतखेडा पाचोरा आदी बस व इतर खासगी वाहने जागेवरच थांबलेली होती या रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सोमवारी (दि.१३) सकाळी परिसरातील गावातील समाजबांधव मोठ्या संख्येने वरठाण चौफुलीवर जमा होत आरोपीचा शोध घेऊन तत्काळ अटक करण्याची मागणी करीत होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिस निरीक्षक पंकज बारवाल यांनी कारवाईचे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले. सकाळी दहा वाजता रस्ता सुरळीत करण्यात आला.या घटनेप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सोयगाव पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गजानन आरेकर, जमादार संदीप सुसर, राजेंद्र बर्डे, नारायण खोडे आदी तपास करीत आहेत.


## क्षमस्व

दिनांक १४ एप्रिल रोजी पान क्रमांक ५ वर सरोजाताई बोराडे यांचे निधन अशी बातमी प्रकाशीत झाली होती. मात्र सरोजाताई यांच्या सासूचे निधन झाले होते. नजर चुकीने नावात चुक झाली त्याबद्दल आम्ही क्षमस्व आहोत. सरोजाताईंना दिर्घायुष्य लाभो ही आमची सदिच्छा. झालेल्या नजरचुकीबद्दल आम्ही क्षमस्व आहोत.

-संपादक

# बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे यांना मातृशोक

मंठा प्रतिनिधी



कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे यांच्या आई, तसेच नगरसेविका सौ. सरोजाताई प्रल्हादराव बोराडे यांच्या सासूबाई श्रीमती प्रयागबाई रेणाजीराव बोराडे यांचे सोमवार दि.१३ रोजी सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ११३ वर्षे होते.शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, पंजाबसिंह बोराडे व मानसिंह बोराडे यांच्या त्या आजी होत्या. त्यांच्यावर मंगळवार रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंड, पतवंड असा मोठा परिवार आहे.

# नांदेडमध्ये जर्दा कारखाना उद्ध्वस्त ; अवैध धंद्यांविरुद्ध डीआयजी आक्रमक

नांदेड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम उघडत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या विशेष पथकाने अर्धापूर आणि देगलूर तालुक्यात दोन मोठे छापे टाकले. या कारवाईत बनावट सुगंधित जर्दा तयार करणारा कारखाना उद्ध्वस्त करण्यात आला असून, दुसऱ्या कारवाईत जुगार अड्ड्यातून ८ आरोपींना जेरबंद केले. दोन्ही कारवायांमध्ये एकूण ७ लाख ३७ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अर्धापूर येथील इंदिरानगर भागात सय्यद जाकीर उर्फ बाबा गुलाम दस्तगीर हा आपल्या राहत्या घरी बनावट जर्दा तयार करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सोमवारी पथकाने या ठिकाणी छापा टाकला असता धक्कादायक प्रकार समोर आला. आरोपी हा कमी प्रतीच्या जर्दामध्ये घातक रसायने, ग्लिसरीन आणि पॅराफीन मिसळून नामांकित कंपन्यांच्या नावाने पॅकेजिंग करत असे. पोलिसांनी घटनास्थळावरून जर्दा बनवण्याचे मशीन, कच्चा माल आणि रसायने असा एकूण ३ लाख ४४ हजार ४५० रुपयांचा साठा जप्त केला. अर्धापूर पोलिसांत याप्रकरणी गुन्हा दाखल असून पोहेकॉ. संतोष काळे तपास करत आहेत. दुसरी कारवाई रविवारी देगलूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुषावाडी शिवारात करण्यात आली. रंजित इंगोले यांच्या शेतातील एका खोलीत जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली होती. पोलिसांनी छापा टाकून ८ आरोपींना रंगेहात ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३६,३४० रुपये रोख, ८ मोबाईल आणि ७ दुचाकी असा एकूण ३ लाख ९३ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोउपनि. महाजन मैसनवाड पुढील तपास करत आहेत.पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे, पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, संजीव जिंकलवाड, गणेश धुमाळ आणि कामाजी गवळी यांच्या पथकाने ही कामगिरी फत्ते केली.

# पाथर्डीची जलवाहिनी मातीत गाडली !

## गंगामाई बोरवेलचा गळा घोटणाऱ्या कसाई ठेकेदारावर कारवाईची मागणी



पाथर्डी । प्रतिनिधी

भीषण दुष्काळात पाथर्डी शहर आणि तालुक्याची तहान भागवली ज्या ठिकाणाहून शेकडो टँकर भरून गावोगावी पाणी पोहोचवले गेले त्या ऐतिहासिक गंगामाई बोरवेलचे अस्तित्व आज मिटवण्यात आले आहे. विकास कामाच्या नावाखाली एका जिवंत जलस्त्रोताचा बळी देणाऱ्या ठेकेदाराचा आणि त्याला मूकसंमती देणाऱ्या नगरपालिका प्रशासनाचा जाहीर निषेध पाथर्डी शहरवासीयांच्या वतीने होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पाथर्डी शहरातील सावरकर मैदानावर असलेला हा गंगामाई बोरवेल पाथर्डीसाठी वरदान ठरला होता. शहरात रस्त्याचे काम सुरू असताना, संबंधित ठेकेदाराने जेसीबीच्या साहाय्याने हा बोर चक्क तोडून टाकला आहे. धक्कादायक बाब म्हणजे बोरमधील मोटार देखील तशीच खाली गाडली गेली असून, संपूर्ण बोर बुजवण्यात आला आहे. रस्ते विकास करताना आडवा न येणारा बोर बुजवण्याची परवानगी ठेकेदाराने घेतली होती का? जर भविष्यात पावसाने ओढ दिली आणि दुष्काळ पडला तर पाथर्डीकरांची तहान भागवायला हा ठेकेदार पाणी आणणार आहे का? जिवंत जलस्त्रोताचे पुनरुज्जीवन करण्याऐवजी तो कायमचा नष्ट करण्याचा अधिकार ठेकेदाराला कुणी दिला? नगरपरिषद प्रशासन या गंभीर प्रकारावर गप्प का? नगरपालिका प्रशासनाने या ठेकेदाराला जाब का विचारला नाही असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. पाथर्डी नगरपरिषदेच्या रस्ते काँक्रिटीकरण विकास कामाच्या आडून पाथर्डी शहराची जलवाहिनी असलेल्या गंगामाई बोरवेल विनापरवाना तोडफोड करून बुजवून टाकणाऱ्या कसाई ठेकेदारावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

एकीकडे सरकार पाणी अडवा पाणी जिरवा च्या गप्पा मारते आणि दुसरीकडे पाथर्डीत सरकारी कामाच्या नावाखाली जिवंत जलस्त्रोत बुजवले जातात हा केवळ बोरवेल नाही तर पाथर्डीकरांच्या हक्काचे राखीव पाणी होते. या प्रकारामुळे नगरपरिषदेचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

- जुनेद पठाण, पाथर्डी.

# उद्धव ठाकरेंचा पक्ष संपुष्टात; आदित्य अजून परिपक्व नाहीत - संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

शिवसेना नेते तथा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. उद्धव ठाकरेंच्या जागी आदित्य ठाकरे यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती होणार असल्याच्या चर्चांवर बोलताना, आदित्य हे पक्ष चालविण्यास अद्याप परिपक्व नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच उद्धव ठाकरेंचा पक्ष आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर असून तो ''प्रायव्हेट लिमिटेड'' स्वरूपाचा झाल्याची टीकाही त्यांनी केली.



शिरसाट म्हणाले की, १९ तारखेला आदित्य ठाकरे यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती होणार असल्याची चर्चा सुरू आहे. हा प्रकार म्हणजे इतिहासाची पुनरावृत्तीच असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी उद्धव ठाकरे यांनीही अशाच पद्धतीने नेतृत्व स्वीकारले होते. आता आदित्य ठाकरे हेच पक्षाची धुरा सांभाळण्याच्या तयारीत असल्याचा संकेत मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. पक्षात अनेक ज्येष्ठ नेते असतानाही त्यांना संधी न देता सर्व निर्णय एकाच केंद्रातून घेतले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. पक्षात एककलमी कारभार सुरू असून कुणाचेही मत विचारात घेतले जात नाही, असे शिरसाट म्हणाले. आदित्य ठाकरे आणि संजय राऊत यांच्यात मतभेद असल्याचेही त्यांनी सूचित केले. तसेच आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाला पक्षातील अनेकजण मान्यता देण्याच्या मनस्थितीत नसल्याचा दावा त्यांनी केला. राज्यात सध्या शिवसेनेकडून घेतल्या जाणाऱ्या बैठकींमध्ये मंत्र्यांच्या कामकाजाबाबत कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या साडेतीन वर्षांत सातत्याने निवडणुका पार पडल्या आणि पक्षाची कामगिरी चांगली राहिली, असे त्यांनी सांगितले. सध्या निवडणुका नसल्याने कार्यकर्त्यांशी संवाद वाढविण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांनी आपले प्रश्न आणि नाराजी मोकळेपणाने मांडली पाहिजे. त्यांच्या मनातील खदखद बाहेर पडणे आवश्यक आहे. संवाद नसेल तर पक्षासाठी ते हितावह ठरणार नाही, असेही शिरसाट यांनी नमूद केले.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

गुरूवार दि.१६ एप्रिल २०२६ | ६

# भीम जयंतीत पालिकेचे गलिच्छ राजकारण!

## नगरपरिषदेच्या निष्काळजीपणामुळे नागरिक रस्त्यावर पडले





**बीड । प्रतिनिधी**

**काल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण असताना, बीड नगरपरिषदेच्या भयंकर निष्काळजीपणामुळे संतापाची लाट उसळली आहे. शहरातील मुख्य रस्त्यांच्या मधोमध मोठमोठे खड्डे पडलेले असताना, कोणताही डांबराचा आधार न देता केवळ खडी टाकून तात्पुरती बळवण करण्यात आली होती. यामुळे असंख्य महिला व पुरुष वाहनावरून घसरून पडले, काहींना किरकोळ दुखापतीही झाल्या. नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे.**

वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी ही गंभीर बाब नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरच तात्काळ खडी हटवण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र, संध्याकाळी भीम जयंतीची भव्य रॅली विविध भागांतून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याकडे येत असताना आणखी एक धक्कादायक प्रकार घडला. सार्वजनिक जयंती उत्सव समितीचा रथ पुढे गेल्यानंतर अचानक नाल्याचे घाण पाणी रस्त्यावर साचले. ऐन मिरवणुकीच्या मार्गावर गटारीचे दुर्गंधीयुक्त पाणी साचल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. हा प्रकार अपघाती होता की अनुसूचित जातीच्या नागरिकांना जाणीवपूर्वक त्रास देण्यासाठी नाली फोडण्यात आली? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, स्वच्छता सभापती शेख निजाम तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अनुसूचित जातीच्या ▶▶ पान २ वर

## डॉ.आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या न.प. अधिकाऱ्यांना निलंबित करा–पप्पू कागदे



बीड । प्रतिनिधीभारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती घाण पाणी सोडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर चर,खडी टाकून अनेक आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बीड नगर परिषद बांधकाम अभियंता किरण देशमुख व पाणीपुरवठा अभियंता प्रमोद माने यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. अशी मागणी युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देऊन केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती बारीक चर,खडी टाकून घाण पाणी सोडल्यामुळे खडीवरून घसरून अनेक महिला भगिनी, पुरुष व रिपाइंचे बीड शहराध्यक्ष अविनाश जोगदंड जबर जखमी झाले आहेत. ही बाब अत्यंत खेदजनक असून जयंती उत्सवाला गालबोट लावणारी आहे. आंबेडकरांच्या मिरवणुकी दरम्यान रस्त्यावर घाण पाणी सोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर बारीक चर,खडी टाकून आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बांधकाम अभियंता किरण देशमुख, पाणी पुरवठा अभियंता प्रमोद माने व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. नसता बीड शहर रिपाइंच्या वतीने बीड नगर परिषदवर सोमवार दि. २० एप्रिल २०२६ रोजी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, राजू जोगदंड, प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, कपिल साळवे, विष्णू जोगदंड, तुषार जाधव, सिद्धिक फारोखी, के.के.कांबळे, भैय्यासाहेब वाघमारे आदींनी केले.

## पेठ बीड पोलिसांनी ३५ कि.मी. पाठलाग करून आरोपी पकडला



**बीड । प्रतिनिधी**

**खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यात गेल्या महिनाभरापासून फरार असलेल्या सराईत गुन्हेगाराला पेठ बीड पोलिसांनी तब्बल ३५ किलोमीटर पाठलाग करून शिताफीने अटक केली आहे. अभिषेक विश्वास ऊर्फ पोपट डोंगरे (वय २५, रा. सोन्नाखोटा, ता. वडवणी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.**

४ मार्च २०२६ रोजी फिर्यादी अमोल अशोकराव कांबळे (रा. बार्शीनाका, बीड) यांच्या ट्रॅव्हल्सची स्टेपनी काढून आरोपींनी १० हजार रुपयांची मागणी केली होती. यावेळी झालेल्या वादात आरोपी अभिषेक डोंगरे याने फिर्यादीच्या डोक्यात लोखंडी हत्याराने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या विविध कलमांनुसार गुन्हा (गुरनं. ७१/२०२६) दाखल करण्यात आला होता. १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत आरोपी बीडमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात येणार असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी सापळा रचला असता, गर्दी आणि अंधाराचा फायदा घेऊन आरोपी भिंतीवरून उडी मारून पळाला. यानंतर, आरोपी वडवणीच्या दिशेने जात असल्याचे समजताच पोलिसांनी त्याचा पाठलाग सुरू केला. अखेर तरे गावातील एका नातेवाईकाच्या गच्चीवर दबा धरून ▶▶ पान २ वर

## कासारी पुल ‘कासवगती’ने सुरू; पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न झाल्यास महामार्ग ठप्प होणार-भोसले



**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी ते अहिल्यानगर या तालुक्यातील अत्यंत महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या मार्गावरील कासारी येथील पुलाचे काम प्रचंड संथगतीने सुरू असल्याने येणाऱ्या पावसाळ्यात मोठ्या वाहतूक कोंडीचे संकट उभे ठाकले आहे. संबंधित ठेकेदाराच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत असून, हे काम ७ जूनपूर्वी पूर्ण झाले नाही तर संपूर्ण वाहतूक व्यवस्था कोलमडण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.**

आष्टी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले यांनी या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधत तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात त्यांनी पुलाचे काम तातडीने, दर्जेदार आणि युद्धपातळीवर पूर्ण करण्याची मागणी केली आहे. भोसले यांनी स्पष्ट केले की, सध्या आष्टी–अहिल्यानगर मार्गाचे काम मोठ्या वेगाने सुरू असून साबलखेड ते अहिल्यानगर या टप्प्यातील काम झपाट्याने पूर्ण होत आहे. तसेच कडा ते आष्टी या मार्गाचे जवळपास ९० टक्के काम पूर्णत्वास गेले आहे. मात्र, या सर्व प्रगतीला कासारी येथील अर्धवट पुलाचे काम मोठा अडथळा ठरत आहे. कासारी येथे जुना पुल पाडुन नवीन पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले असले तरी कामाचा वेग अत्यंत निराशाजनक आहे. पावसाळा अगदी दारात येऊन ठेपला असताना देखील कामात कोणतीही गती दिसून येत नाही. जर वेळेत पूल पूर्ण झाला नाही, तर पावसाळ्यात पर्यायी मार्ग नसल्याने वाहनधारकांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागतील, अशी भीती व्यक्त होत आहे. हा पूल केवळ स्थानिक नव्हे तर आंतर तालुका वाहतुकीसाठीही अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे हे काम रखडल्यास संपूर्ण वाहतूक विस्कळीत होण्याचा ▶▶ पान २ वर

## पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान संपन्न



**माजलगाव । प्रतिनिधी**

पक्ष संघटनेत काम करत असताना भारतीय जनता पार्टीचा प्रशिक्षित कार्यकर्ता निर्माण व्हावा व भारतीय जनता पार्टीचे संघटनात्मक काम अजून चांगल्या प्रकारे वाढावे या उद्देशाने उद्देशाने संपूर्ण देशभर पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान चालू आहे त्याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टी माजलगाव शहर मंडळाच्या वतीने श्री सिद्धेश्वर संकुल भारत माता सभागृह येथे दोन दिवसीय पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात पार पडले. या प्रशिक्षण शिबिरास प्रदेश व विभागीय पातळीवरील नेते गण वक्त्यांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे माजलगावात मोठा नेता नसताना देखील भाजपा माजलगावचे शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी सर्वांनी आदर्श घ्यावा असे नियोजनबद्ध शिबिर ▶▶ पान २ वर

## पाटोद्यात विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ

### विनापरवाना आणि विनाविमा स्कूल रिक्षांची सुसाट धाव!

**पाटोदा। प्रतनिधी**

**शहरातील विविध इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची ने–आण करणाऱ्या रिक्षा आणि स्कूल बसच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अनेक रिक्षा चालकांकडे अधिकृत परवाने नसून, बहुतांश वाहनांचा विमा (इन्शुरन्स) देखील संपलेला असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. अशा परिस्थितीत एखादा अपघात घडल्यास याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.**

पाटोदा शहरात दररोज शेकडो विद्यार्थी खासगी रिक्षा आणि बसने शाळेत जातात. नियमानुसार, शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, वैध परवाना आणि विमा असणे अनिवार्य आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक वाहने या नियमांना हरताळ फासत आहेत. विम्याची मुदत संपलेली असतानाही ही वाहने मुलांनी गच्च भरून रस्त्यावरून धावत आहेत. अनेक पालक आपल्या पाल्याला शाळेत पाठवताना केवळ सोयीचा विचार करतात. रिक्षाचालकाकडे परवाना आहे का किंवा वाहनाचा विमा उतरवला आहे का, याची साधी शहानिशा देखील पालक करत नाहीत. पालकांचा हा 'डोळेझाक'पणा एखाद्या मोठ्या दुर्घटनेला निमंत्रण देणारा ठरू शकतो. मुलांच्या सुरक्षिततेसाठी पालकांनी अशा असुरक्षित वाहनांतून मुलांना पाठवणे तातडीने थांबवण्याची गरज आहे. शहरातील ▶▶ पान २ वर

## विठ्ठलगडावर अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन

### निस्वार्थ कीर्तन सेवेची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद






**पाटोदा । प्रतिनिधी**

**श्री क्षेत्र विठ्ठलगड, ता. पाटोदा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी मिती वैशाख शु.द्वितीया दिनांक १९/४/२०२६ ते वैशाख शु दशमी २६/४/२०२६ या कालावधी मध्ये अखंड हरीनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले असून यंदा या सोहळ्याचे तिसरे वर्ष आहे. सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जाणार आहे.**

या सप्ताहात दररोज काकडा आरती, हरिपाठ, श्री ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन, भजन आदी धार्मिक कार्यक्रमांची भक्तिमय रेलचेल पाहायला मिळत आहे. या अखंड हरीनाम सप्ताहा मध्ये ह.भ.प.श्री नवनाथ महाराज फुटाणे,ह.भ.प.श्री समाधान महाराज शर्मा, ह.भ.प.श्री प्रकाश महाराज साठे, ह.भ.प.श्री आक्रुर महाराज साखरे, ▶▶ पान २ वर

## युगप्रवर्तक चषक पोलीस प्रशासनाने जिंकला!



**माजलगाव । प्रतिनिधी**

‘युगप्रवर्तक चषक २०२६’’ या प्रतिष्ठित क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला असून,यंदाच्या स्पर्धेत पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या नेतृत्वात पोलीस प्रशासनाच्या संघाने शानदार कामगिरी करत चषकावर आपले नाव कोरले.ही स्पर्धा यंदा बाराव्या वर्षात पदार्पण करत असून,कर्मचारी वर्गासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांच्या वतीने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. कर्मचारी वर्गातील क्रीडागुणांना वाव देणे, शारीरिक तंदुरुस्ती वाढवणे आणि एकात्मता दृढ करणे हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश आहे.विशेष म्हणजे,या स्पर्धेत केवळ कर्मचारीच सहभागी होत असल्याने तिची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.यंदाच्या स्पर्धेत शहर व परिसरातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतील एकूण सहा संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.संपूर्ण स्पर्धेदरम्यान पोलीस प्रशासनाच्या संघाने शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत ▶▶ पान २ वर

## मोठेवाडीत शिवमहापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील मोठेवाडी येथील बालकिशन बाहेती यांच्या शेतातील तिलेश्वर महादेव मंदिरात दि.१८ एप्रिल शनिवार रोजी पासून सुरू असलेल्या शिव महापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताहाची दि १५ एप्रिल बुधवार रोजी श्री.ह.भ.प. बाबा महाराज गिरी यांच्या काल्याच्या किर्तनाने व महाप्रसादाने सांगता झाली.**

कथा प्रवक्ते कुमार सागर स्वामी महाराज लोहारेकर यांच्या मधुरमय वाणीतुन शिव महापुराण कथा झाली.त्यांना संगीतसाथ सर्वश्री सुरमणी शिवलिंग रामलिंग जळकोटे,सिद्धलिंग तळेकर,आत्मलिंग गिराम,दत्ता वेळे,गोपाळ देशमुख यांनी केली. यामध्ये सकाळी ५:०० वाजता काकडा भजन,दुपारी १:०० ते ५:०० वाजेपर्यंत शिवमहापुराण कथा, सायंकाळी ६:०० ते ७:०० हरिपाठ व रात्री ८:३० ते १०:३० दि.१८ एप्रिल शनिवार रोजी श्री हभप शुभांगीताई चौरे,गुरूवार रोजी श्री. हभप माऊली महाराज जाहुरकर, शुक्रवार रोजी सागर महाराज लोहारेकर, शनिवार रोजी सदानंद महाराज लखने, रविवार रोजी दिलीप महाराज गटकळ, सोमवार रोजी महंत आप्पासाहेब महाराज चौरे, मंगळवार रोजी आचार्य ज्ञानचैतन्यजी महाराज यांची हरिकिर्तने झाली. दि.१५ एप्रिल बुधवार रोजी सकाळी ८:०० ते १०:०० गावातुन भव्य दिव्य ग्रंथ दिंडी काढण्यात आली. या ग्रंथ दिंडीचे गावात महिलांनी घरासमोर रांगोळी काढून स्वागत केले.सकाळी ११:०० ते २:०० श्री. हभप बाबा महाराज गिरी यांचे काल्याचे किर्तन झाले व शिव महापुराण कथेचे यजमान बालकिशन जगन्नाथ बाहेती यांचा महाप्रसाद झाला. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी कथा, किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम चैतन्यदायी करण्यासाठी हभप बळीभाऊ पास्टे, महादेव तपसे,बाबा कुंभार, पप्पु खेत्री, हरिभाऊ खेत्री, विलास खेत्री, विष्णु वीर,महादेव वीर,कैलास खेत्री, कल्याण खेत्री, तुकाराम जंगले ,दिनकर पास्टे यांच्यासह समस्त मोठेवाडी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## आ.धस यांनी मागणी करताच सीना प्रकल्पातून पाणी सोडले,ग्रामस्थांकडून आभार व्यक्त



**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नावर आमदार सुरेश धस यांनी पत्राद्वारे मागणी करताच यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, सीना प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आमदार सुरेश धस या निर्णयामुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

आष्टी मतदारसंघात आमदार सुरेश धस यांनी कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २, श्रीगोंदा येथील कार्यकारी अभियंत्यांना पत्राद्वारे आष्टी तालुक्यातील सीना प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील पिंपरी (घुमरी), कानडी बुद्रुक आणि वाकी या तीन बंधाऱ्यांमध्ये पाणी साठवून शेती सिंचनासाठी तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या मागणीची त्वरित दखल घेत प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली. प्रत्यक्ष उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आल्याने लाभ क्षेत्रातील पिकांना मोठा आधार मिळणार असून, जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी आमदार सुरेश झ यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. ‘‘योग्य वेळी पाणी मिळाल्यामुळे आमची मोठी चिंता दूर झाली,’’ अशा भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात आल्या. याबाबत आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, ‘‘शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. भविष्यातही त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहे.’दरम्यान, प्रशासनाकडूनही या भागातील पाणीपुरवठा सुरळीत व नियोजनबद्ध ठेवण्यासाठी विशेष लक्ष दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# उंड्री-मोहम्मदवाडीत पाण्याचा तीव्र तुटवडा; ८.५ लाख नागरिक टँकरवर अवलंबून



पुणे: । प्रतिनिधी

महंमदवाडी-उंड्री आणि कोंढवा परिसरातील सुमारे साडेआठ लाख नागरिकांना अद्यापही महापालिकेच्या पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. या भागांत आजही नागरिकांना महापालिकेकडून एक थेंबही पाणी मिळत नसल्याची गंभीर स्थिती आहे. विशेष म्हणजे कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या ४० एमएलडी (चार कोटी लीटर) क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या पूर्ण होऊनही गेल्या सात वर्षांपासून त्या कोरड्याच पडून आहेत.

या भागाचा महापालिकेत समावेश होऊन तब्बल १५ वर्षे उलटली असतानाही नियमित पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव नाराजी असून, त्यांनी वारंवार निवेदने देत आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. मात्र, प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार आहे. महापालिकेच्या म्हणण्यानुसार, दोन ठिकाणी प्रत्येकी सुमारे ३०० मीटर पाइपलाइनचे काम शिल्लक आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर आठही पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी पोहोचू शकते. याशिवाय, कात्रज-कोंढवा रस्त्यावर १२५ मीटर जागेचा प्रश्न अद्याप निकाली न लागल्याने अडथळा निर्माण झाला आहे. संबंधित ठिकाणी बांधकाम आणि जागेच्या ताब्याच्या अडचणींमुळे भूमिगत पाइपलाइन टाकण्यास अडथळे येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, काही नागरिकांनी या विलंबामागे टँकर माफियांचा हस्तक्षेप असल्याचा गंभीर आरोप केला आहे. नियमित पाणीपुरवठा सुरू झाल्यास टँकर व्यवसायावर परिणाम होईल, या भीतीने पाइपलाइन कामात अप्रत्यक्ष अडथळे आणले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. काही सोसायट्यांवर खासगी टँकरचे पाणी घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

शहराच्या वाढत्या उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकामांना परवानगी देताना विकसकांनी पाणीपुरवठ्याची हमी दिली होती. मात्र, प्रत्यक्षात ती पूर्ण न झाल्याने रहिवाशांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. महंमदवाडी-उंड्री भागात टाक्या उभ्या असल्या, तरी त्या कोरड्या असल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढला आहे.

पाण्याचा पुरवठा नसल्याने रिकाम्या टाक्यांचा गैरवापर होत असल्याचे समोर आले आहे. काही ठिकाणी तरुणांकडून सेल्फी, व्हिडिओ शूटिंग, तसेच अशोभनीय कृत्ये केल्याच्या घटना घडत आहेत. टाक्यांभोवती कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने धोका वाढला आहे.



## केरोसीन वितरणासाठी नवे नियम; प्रत्येक कुटुंबाला ३ लिटर रॉकेल

पुणे। प्रतिनिधी

केरोसीन (रॉकेल) वितरणाबाबत प्रशासनाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. यानुसार प्रत्येक लाभार्थी कुटुंबास प्रतिशिधापत्रिका तीन लिटर केरोसीन देण्यात येणार आहे. अंत्योदय व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

उपलब्धतेनुसार श्वेतपत्रिकाधारक, शिधापत्रिका नसलेले कुटुंब (ग्रामपंचायत दाखल्यासह) तसेच स्थलांतरित मजूर यांनाही वितरण केले जाईल. केरोसीनचा संपूर्ण कोटा वाटप दिनांकापासून ४५ दिवसांत उचलणे बंधनकारक असून, उर्वरित साठा पुढे नेण्यात येणार नाही. वितरण प्रक्रिया तेल कंपन्यांचे वितरक, किरकोळ परवानाधारक/ रास्तभाव दुकानदार, लाभार्थी अशा टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. प्रत्येक लाभार्थ्यास तीन लीटरप्रमाणे वाटप करणे आवश्यक असून, दर जिल्हाधिकाऱ्यांनी निश्चित केलेले राहतील. तेल कंपन्यांनी पुरवठा नियमित ठेवावा, तसेच ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. तालुकास्तरावर तहसीलदारांच्या देखरेखीखाली वितरण होणार असून, गैरवापर टाळण्यासाठी संयुक्त तपासणी पथक (तहसीलदार, पुरवठा अधिकारी, पोलिस) नियुक्त करण्यात येणार आहे. केरोसीनचा वापर फक्त घरगुती कारणासाठीच करता येणार असून, भेसळ किंवा अनधिकृत विक्री आढळल्यास जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात येईल. संबंधितांनी या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अकरावी प्रवेशाला मोठा प्रतिसाद; चार दिवसात १.१० लाख अर्ज



पुणे। प्रतिनिधी

अकरावी प्रवेशासाठी अर्ज भरण्यास सुरुवात होऊन अवघे चार दिवस झाले असले तरी अर्ज भरण्यास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, केवळ चार दिवसांत तब्बल एक लाख १० हजार २२१ विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग एक भरला असल्याचे स्पष्ट झाले आहे. पात्रताधारक विद्यार्थ्यांना ३० एप्रिलपर्यंत नोंदणी करून अर्जाचा भाग एक भरता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता अकरावी प्रवेशासाठी यंदाही राज्यस्तरावर ऑनलाइन केंद्रिभूत प्रवेशप्रक्रिया राबविली जात आहे. शिक्षण विभागातर्फे विद्यार्थ्यांना दि. १० एप्रिलपासून नोंदणी करण्यास उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यापूर्वी केवळ महत्त्वाच्या महापालिकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांत इयत्ता अकरावी प्रवेशासाठी केंद्रिभूत ऑनलाइन प्रवेशपरीक्षा घेतली जात होती; परंतु गेल्या शैक्षणिक वर्षापासून राज्यस्तरावर एकाच संकेतस्थळाच्या माध्यमातून ही केंद्रिभूत ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविली जात आहे.यंदा राज्यातील ९ हजार ५५१ महाविद्यालयांनी नोंदणीसाठी सहभाग घेतला आहे. एकूण जागांची उपलब्धता अद्याप उपलब्ध करण्यात आली नसली तरी, अंदाजे २२ लाखांहून अधिक जागा अकरावी प्रवेशासाठी उपलब्ध होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना नोंदणी करून त्यांची प्राथमिक माहिती नोंदविता येणार आहे. यात विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती, तसेच आरक्षणासाठीचा प्रवर्ग, शाळेचे नाव व इतर तपशीलाचा समावेश आहे. नोंदणीला सुरुवात होताच, राज्यस्तरावर अर्ज दाखल करण्यासाठी लगबग पाहायला मिळाली. सध्याच्या वेळापत्रकानुसार नोंदणीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत असेल. प्रवेशाच्या प्रक्रियेत अर्जाचा भाग दोन अतिशय महत्त्वाचा असतो. यात विद्यार्थ्यांनी त्यांना प्रवेश घ्यायच्या शाखा व महाविद्यालयांचा पसंतीक्रम नोंदवायचा असतो. त्यांचा पसंतीक्रम व मिळालेले गुण यांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार केली जाते. त्याआधारे विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. सध्या अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया सुरू असून, निकालानंतर विद्यार्थ्यांना अर्जाचा भाग दोन भरता येणार आहे.

## पुण्यात घरगुती गॅस दिला व्यावसायिक वापरासाठी, दुकानदाराला अटक; १०३ गॅस सिलिंडर जप्त




पुणे । प्रतिनिधी

घरगुती गॅसचा अवैध पद्धतीने साठा करून काळाबाजार करणाऱ्या दुकानावर काळेपडळ पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत तब्बल १०३ गॅस सिलिंडर जप्त करून पोलिसांनी नितीन हनुमंत होळकर (वय ३८, रा. हांडेवाडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. होळकर याच्याकडे गॅस साठवणूक करण्याचा कोणताही परवाना नसताना त्याने या गॅस सिलिंडरच्या टाक्यांचा साठा केला होता.

काळेपडळ पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदार महादेव शिंदे यांना हांडेवाडी परिसरात एक दुकानदार घरगुती गॅस सिलिंडरमधून व्यावसायिक गॅस सिलिंडरमध्ये गॅस ट्रान्स्फर करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. त्या वेळी घरगुती वापरासाठी असलेल्या गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापरासाठी तसेच काळाबाजारासाठी साठा करून ठेवण्यात समोर आले.या वेळी पोलिसांनी तेथून १०३ गॅस सिलिंडर टाक्या, चारचाकी गाड्या आणि इतर साहित्य असा १० लाख ९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. चौकशीत आरोपीकडे गॅस साठवणुकीसाठी आवश्यक परवाना नसल्याचेही निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अत्यावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस उपायुक्त राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनात काळेपडळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मानसिंग पाटील, सहायक निरीक्षक अमित शेटे, अंमलदार प्रवीण काळभोर, दाऊद सय्यद, प्रतीक लाहिगुडे, अमोल फडतरे, विशाल ठोंबरे, शाहीद शेख, लक्ष्मण काळे, अतुल पंधरकर यांच्यासह पथकाने केली.

## पुणेकरांना मोठा दिलासा!

### आजचा 'पाणी बंद' रद्द; शहरात नियमित पाणी येणार

पुणे । प्रतिनिधी

शहराच्या काही भागात टँकर चालकांनी पोलिसांच्या कारवाईच्या विरोधात बुधवारी सकाळपासून बंद पुकारला आहे. त्यामुळे अनेक भागातील नागरिकांना पाणी मिळलेले नाही. त्यातच, उद्या (गुरूवारी) महापालिकेकडून संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतलेला होता.

नागरिकांना ऐन उन्हाळ्यात सलग दोन दिवस पाणी मिळणार नाही. त्यामुळे महापालिकेकडून गुरूवारचा पाणी बंद मागे घेण्यात आला असून उद्या संपूर्ण शहरात नियमित पाणी येणार आहे. तसेच, देखभाल दुरूस्तीची कामे पुढे ढकलण्यात आली असून त्यासाठीच्या पाणीबंदची तारीख लवकरच कळविण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी दिली.

## येरवड्यात मोठी कारवाई!

### स्कॉर्पिओतून विदेशी दारूची तस्करी उघडकीस; पोलीसांनी आवळल्या मुसक्या

पुणे । प्रतिनिधी

स्कॉर्पिओ गाडीतून विदेशी दारूची तस्करीचा डाव लक्ष्मीनगर पोलिसांनी उघडकीस आणला आहे. याप्रकरणी संबंधिताला येरवड्यातील सादलबाबा चौकातून ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून गाडीसह तब्बल २ लाखांची विदेशी दारू, गाडी, मोबाइल असा मिळून २३ लाख ३१ हजारांचा ऐवज जप्त केला आहे. (झींपश उीळाश छशुी)अंग्रेजसिंग पुरणसिंग गील (वय ३८ वर्ष, रा. रामनगर बोपखेल) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्याविरूद्ध लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.


अवैध व्यावसायिकांविरूद्ध कठोर कारवाईच्या आदेशानुसार १४ एप्रिलला लक्ष्मीनगर पोलीस हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी पोलीस अमलदार भिमराव कांबळे, अमोल वायाळ यांना मोटारीतून विदेशी दारूची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली.त्यानुसार पोलीस उपायुक्त चिलुमुला रजनिकांत, एसीपी सुनिल जैतापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने सादलबाबा चौकात सापळा रचला. संशयित वाहन चालकाला अडवून त्याच्या वाहनाची (एम.एच.१४ एल.पी. ७४७४) तपासणी केली. त्यावेळी गाडीच्या डिकीत २ लाखांची विदेशी दारू, मोबाइल, असा २३ लाख ३० हजारांचा ऐवज जप्त केला.

## पुण्यात एमडी ड्रग्स तस्करी उघड; दोघांना अटक, २६ लाखांचा मुद्देमाल जप्त

पुणे। प्रतिनिधी

विमानतळ पोलिसांनी मेफेड्रोन (एमडी) या अमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या दोघांना बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून एमडी, मोटार असा २६ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्रीतम प्रफुल्ल कुलकर्णी (वय ३७, रा. साईनाथनगर, वडगाव शेरी), उबेर अन्सार खान (वय २७, रा. रेल्वे गेटजवळ, हडपसर) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. दोघांच्या विरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.पोलिस कर्मचारी हरी पुंडे आणि लालू कऱ्हे या दोघांना बातमी मिळाली होती की, जनक बाबा दर्गा चौकाजवळ खराडी बायपास चौकातून फॉरेस्ट पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यावर एक व्यक्ती एमडी विक्रीसाठी येणार आहे. त्यानुसार पोलिस उपनिरीक्षक नितीन राठोड आणि त्यांच्या पथकाने प्रीतम याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३.५९ ग्रॅम एमडी आणि दुचाकी जप्त करण्यात आली. चौकशीत त्याने उबेर खान याचे नाव सांगितले.

## सावरकर मानहानी प्रकरणात सात्यकी सावरकरांचे न्यायालयात महत्त्वाचे विधान



पुणे। प्रतिनिधी

अंदमान कारागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबरोबर काळ्या पाण्याची शिक्षा भोगणाऱ्या ५६८ क्रांतिकारींनी हालअपेष्टा सहन केल्या. यामध्ये, काहींचा मृत्यू झाला. ते सर्व माझ्यासाठी समान असून, मला त्यांच्याविषयी आदर आहे, अशी माहिती स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी न्यायालयात दिली. काळ्या पाण्याच्या शिक्षेदरम्यान काही क्रांतिकारकांचा अंदमानच्या कारागृहातच मृत्यू झाल्यामुळे त्यांना देखील स्वातंत्र्यवीर म्हणता येईल का? या बचाव पक्षाने विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

लंडन येथील अनिवासी भारतीयांसमोर राहुल गांधी यांनी केलेल्या भाषणात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी बदनामीकारक विधान केले होते. त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी गांधी यांच्याविरोधात मानहानीचा दावा दाखल केला आहे. पुणे जिल्हा व सत्र न्यायालयातील एमपीएमएलए या विशेष न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरू आहे. सध्या फिर्यादी सात्यकी सावरकर यांची उलटतपासणी सुरू आहे. बचावपक्षातर्फे ड. मिलिंद पवार हे उलटतपासणी घेत असून, यादरम्यान त्यांनी विविध तांत्रिक मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले.उलटतपासणी करताना ड. पवार यांनी, स्वातंत्र्यसंग्रामात योगदान देणाऱ्या सर्व क्रांतिकारकांना 'स्वातंत्र्यवीर' म्हणणे योग्य ठरेल का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर सावरकर यांनी, सशस्त्र व निशस्त्र अशा दोन्ही प्रकारचे क्रांतिकारक होते, असे सांगत, 'महात्मा' ही उपाधी मोहनदास करमचंद गांधी यांना जनतेने दिली.चळवळीत सामील झालेल्या निशस्त्र क्रांतिकारकांना 'महात्मा' म्हटले गेले नाही. तसेच आझाद हिंद सेनेत सामील झालेल्या सर्व सैनिकांना 'नेताजी' म्हटले जात नाही. त्याचप्रमाणे जनतेने उत्स्फूर्तपणे 'स्वातंत्र्यवीर' ही उपाधी वि. दा. सावरकर यांना दिली. त्यामुळे कुठल्याही क्रांतिकारकांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान कमी होत नाही. अंदमानमधील इतर क्रांतिकारकांना 'स्वातंत्र्यवीर' न म्हणणे हे समानतेच्या विरोधात आहे का, या उपप्रश्नावर त्यांनी, माझ्या दृष्टीने सर्वच क्रांतिकारक समान असून त्यांच्याविषयी आदर आहे. त्यामुळे कोणालाही महात्मा, स्वातंत्र्यवीर, लोकमान्य किंवा क्रांतिवीर म्हणण्यास माझा आक्षेप नाही, असे स्पष्ट केले. तसेच, स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, वि. रा. शिंदे यांच्या अथक प्रयत्नांमुळे सर्व समाजघटकांना शिक्षणाचे दरवाजे खुले झाले. हेही फिर्यादी सात्यकी यांनी मान्य केले. या खटल्यात ड. मिलिंद पवार यांना ड. योगेश पवार, ड. ज्ञानेश्वरी जाधव, ड. सुयोग गायकवाड आणि ड. हर्षवर्धन पवार हे सहकार्य करीत आहेत. पुढील सुनावणी दि २९ एप्रिल रोजी होणार आहे.

## उसाचा एफआरपी थकीत; कारखान्यांचे ३० एप्रिलपर्यंत देण्याचे आश्वासन




पुणे। प्रतिनिधी

घाऊक बाजारात साखरेचे दर मंदीत आहेत, इथेनॉलला अपेक्षित उठाव नाही. त्यामुळे उसाची रास्त आणि किफायतशीर किंमतीची (एफआरपी) देय रक्कम शेतकऱ्यांना देण्यात अडचण येत असल्याबाबतचे गाऱ्हाण्यांचे गुऱ्हाळ उपस्थित कारखान्यांच्या प्रतिनिधींनी साखर संचालकांसमोर सुरुच ठेवल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

त्यामुळे आम्ही शेतकऱ्यांना ३० एप्रिलपर्यंत उर्वरित थकीत एफआरपीची रक्कम देऊ, असे रडगाण्याची भूमिका कारखान्यांनी घेतली असून, साखर आयुक्तालयाने या बाबतची पुढील सुनावणी आता ७ मे रोजी साखर संकुल येथे ठेवली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. शेतकऱ्यांना २९ कारखान्यांकडून देय असलेल्या एफआरपीची एकूण रक्कम ३०७४ कोटी ३३ लाख रुपये होती. त्यापैकी कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर २०६१ कोटी ८९ लाख रुपये जमा केलेले आहेत. तर प्रत्यक्षात १०१२ कोटी ४४ लाख रुपये अद्यापही देणे बाकी आहे.त्यासाठी साखर आयुक्तालयात सोमवारी (दि. १३) दिनांक ३१ मार्च २०२६ अखेरच्या अहवालानुसार थकीत रकमेपैकी ज्या कारखान्यांनी ८० टक्क्यांपेक्षा एफआरपीची कमी रक्कम शेतकऱ्यांना दिलेली आहे, अशाच २९ कारखान्यांच्या सुनावण्या घेण्यात आल्या. त्याला २४ कारखान्यांचे प्रतिनिधी हजर होते. साखर संचालक (अर्थ) यशवंत गिरी यांच्यासमोर या सुनावण्या झाल्या. गैरहजर राहणाऱ्या कारखान्यांना सुनावणीची पुढील नोटीस काढली जाण्याची अपेक्षा असल्याची माहितीही अधिकाऱ्यांनी दिली.